
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक २७
www.ramprahar.com
◆ गुरुवार, १३ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग
पावसाच्या प्रचंड प्रवाहात तुकसईचा पूल खचला/२
गटारी अमावास्येला खवय्यांचा मांसाहारावर ताव/६
भारत-अफगाणिस्तान टी-२० मालिकेचे वेळापत्रक जाहीर/८

### शॉर्टकर्टपासून दूर राहा; पंतप्रधानांचा 'जेन-झी'ला कानमंत्र



**नवी दिल्ली :** "सोशल मीडिया, रील आणि इन्फ्लुएन्सर्सच्या युगात क्षणिक यशाच्या मागे न धावता तरुणांनी मेहनत आणि संघर्षाचा मार्ग निवडायला हवा. शॉर्टकटचा मोह टाळा," असा मोलाचा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जेन-झी पिढीला दिला आहे. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या 'ट्रायम्फ ऑफ द इंडियन रिपब्लिक : माय लाइफ, माय स्ट्रगल्स' या आत्मचरित्राच्या अनावरणावेळी पंतप्रधान बोलत होते. ते पुढे म्हणाले, अनेक लोक उड्डाणपुलाचा वापर न करता घाईघाईत ट्रॅक ओलांडतात, पण तिथली धोक्याची पाटी आपल्याला आठवण करून देते की, शॉर्टकटने तुमचेच नुकसान होऊ शकते. त्यामुळे यातून बाहेर पडायचे असेल, तर तरुणांनी वाचनाची सवय लावावी आणि संघर्षातून शाश्वत यश मिळवत रहावे."

### पेपरफूट, परीक्षा गैरप्रकारांसंदर्भात केंद्राचा कायदा राज्यात लागू होणार

# भरती परीक्षा पद्धती सुधारणांसाठी राज्यात उच्चस्तरीय समिती : मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात विविध सेवाभरतींसाठी होणाऱ्या परीक्षा पद्धतीत सर्वसमावेशक, अधिक सुरक्षित आणि सर्वसंमतीने सुधारणांसाठी एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. या समितीने राज्यात प्रत्येक विभागात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत सर्वंकष सुधारणांबाबत अहवाल सादर करायचा आहे. वर्षा निवासस्थानी आयोजित या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेही उपस्थित होते, त्यांनीही विविध उपयुक्त सूचना बैठकीत केल्या.



उच्चस्तरीय समिती सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेत राहणार असून राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते, माहिती-तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी आणि नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा त्यात समावेश असेल. या समितीने प्रत्येक महसुली विभागात जाऊन विद्यार्थी, शिक्षण संस्थाचालक आणि संबंधित घटकांशी चर्चा करून त्यांची मते जाणून घ्यायची आहेत. त्या आधारावर राज्यासाठीचे समग्र धोरण ठरविण्यात येईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

अलिकडेच केंद्र सरकारने पेपरफूट आणि परीक्षा गैरव्यवहारासंदर्भात संसदेत कायदा केला आहे. महाराष्ट्राचाही स्वतंत्र कायदा आहेच. तथापि संसदेने केलेला कायदा अधिक कठोर असल्याने तो महाराष्ट्रातही लागू करण्यासंदर्भात येणाऱ्या पंधरवड्यात प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले. त्याचप्रमाणे राज्यात किमान २५ हजार सुरक्षित क्लासरुम उभारण्यात याव्यात, असेही निर्देश त्यांनी दिले.

स्पर्धा परीक्षांमध्ये जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांचीही समन्वय भूमिका, इतर विविध देशांमधील परीक्षा पद्धती, विद्यमान प्रक्रिया आणि त्यातील संभाव्य सुधारणा अशा अनेक विषयांवर यावेळी सांगोपांग चर्चा झाली. राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि इतर वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

# मुंबईत दरड कोसळली
## सात जणांचा मृत्यू; चौघे जखमी

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या कुर्ला पश्चिमेतील एका चाळीवर बुधवारी (दि.१२) मध्यरात्री दरड कोसळून सात जणांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत चौघे जखमी झाले असून ढिगाऱ्याखाली आणखी कोणी अडकले आहे का याचा युद्धपातळीवर शोध सुरू आहे.

डोंगरउतारावरील माती आणि ढिगाऱ्याचा मोठा भाग खाली आल्याने सात ते आठ झोपड्या त्याखाली दबल्या गेल्या. मध्यरात्री अचानक ही दुर्घटना घडल्याने परिसरातील नागरिकांना बाहेर पडायलाही वेळ मिळाला नाही. घटनेची माहिती मिळताच यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली आणि दरडीखाली अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यासाठी बचावकार्य सुरू केले. या दुर्घटनेत सहा जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये मोहम्मद समीर अन्सारी (१४), साहिल हुसेन अब्दुल काझी (१९), मरजिना आरिफ शेख (२७) अबान आरिफ शेख (२), मनत आरिफ शेख (४) विकेट रमेश यादव (२७) आणि ४५ वर्षीय अनोळखी व्यक्तीचा समावेश आहे. याशिवाय चार जण जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



### मृतांच्या वारसांना, जखमींना मदत जाहीर

या दुर्घटनेची माहिती मिळताच मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. या दुर्घटनेत प्राण गमावलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या वारसाला चार लाख रुपयांची तातडीची आर्थिक मदत देण्याची घोषणा महापौरांनी केली आहे तसेच जखमी झालेल्या प्रत्येक व्यक्तीला वैद्यकीय उपचारासाठी ५० हजार रुपयांची मदत देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## पनवेलमध्ये आज 'व्हिजन भारत जेन झी : संवाद ते संकल्प' कार्यक्रम
### भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदर्श शैक्षणिक समूह, सकाळ समूह आणि पनवेल टाइम्स यांच्या संयुक्त विद्यमाने युवकांसाठी 'व्हिजन भारत जेन झी : संवाद ते संकल्प' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन गुरुवारी (दि. १३) सकाळी ११ वाजता आदर्श शैक्षणिक संकुल, देवद-विचुंबे येथे करण्यात आले आहे.

युवकांच्या विचारांना दिशा देणे, त्यांच्या आकांक्षा आणि प्रश्नांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे तसेच विकसित भारताच्या संकल्पनेत युवा पिढीची भूमिका अधोरेखित करणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

या कार्यक्रमासाठी भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण, चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, सकाळ समूह व साम टीव्हीचे मुख्य संपादक निलेश खरे, जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, आदर्श शैक्षणिक समूहाचे चेअरमन धनराज विसपुते यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या प्रेरणादायी संवादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आहे.

## ना. भरत गोगावलेंच्या हस्ते रायगडात मुख्य ध्वजारोहण

**मुंबई :** देशाच्या ८०व्या प्रजासत्ताक दिनाची लगबल सुरु झाली असून शासकीय कार्यालयातही झेंडावंदनाची तयारी करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यात होणाऱ्या झेंडावंदनासाठी मंत्रीमहोदयांची यादी जाहीर केली आहे. त्यामध्ये यंदाच्या यादीत रायगडसाठी ना. भरत गोगावले यांचे नाव जाहीर झाले आहे, तर ना. आदिती तटकरेंना यंदा कोकणच्या विभागीय कार्यालयात ध्वजारोहणाचा मान देण्यात आला आहे.

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर आवश्यक
### आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन; पुस्तक वाटपाचा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञान वाढावे, वाचन संस्कृती रूजावी आणि शाळेतून बाहेर पडताना त्यांचा परिपूर्ण तसेच सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीने आपली वाटचाल असली पाहिजे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुस्तक वाटप कार्यक्रमावेळी केले.



श्री सिद्धिविनायक सोशल संस्थेच्या वतीने भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे नियोजन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष नगरसेवक गणेश कडू यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते या प्रेरणादायी पुस्तकांचे वाटप विद्यार्थ्यांना तसेच महापालिकेच्या इतर शाळांच्या प्रतिनिधींना करण्यात आले.

महापालिकेच्या लोकनेते दि.बा. पाटील शाळेत झालेल्या या कार्यक्रमाला भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, नगरसेवक गणेश कडू, नगरसेविका दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, प्रियांका कांडपिळे, माजी नगरसेवक तेजस कांडपिळे, सुनील बहिरा, शहर सरचिटणीस रूपेश नागवेकर, उपाध्यक्ष केदार भगत, किरण दाभणे, शिक्षण अधिकारी रमेश चव्हाण आदी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## शिष्यवृत्ती परीक्षेत सीकेटी विद्यालयाचे यश : लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून विद्यार्थ्यांचे अभिनंदन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे आयोजित शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश प्राप्त केले आहे. याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयात शिकणारे इयत्ता सातवीतील उज्वल लहू चौगुले, संस्कृती जनार्दन भोपी, सार्थक सुहास माने, प्रथम विलास म्हात्रे आणि काव्या प्रशांत म्हात्रे या पाच विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे. त्यांच्यासमवेत मुख्याध्यापिका स्वाती काळे उपस्थित होत्या.

सीकेटी इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागातील इयत्ता चौथीच्या सहा विद्यार्थ्यांनीही शिष्यवृत्ती मिळविली. यामध्ये स्वरा रणजित ठोकळ, चिन्मयी नितीन शाह, चिन्मय योगेश बिरगावले, नावण्या मंगेश वामन, अंश प्रशांत तुपेरे, दिनिशा सच्चिदानंद नेरूरकर यांचा समावेश आहे. त्यांच्यासोबत मुख्याध्यापिका निलिमा शिंदे होत्या. सर्व यशस्वी विद्यार्थी आणि त्यांच्या मार्गदर्शकांचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## निवडक

### विरोधकांना चर्चा हवी की गदारोळ? -गृहमंत्री शाह

**नवी दिल्ली :** संसदेत विरोधकांकडून सुरू असलेल्या गदारोळाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी "मी संसदेत कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देण्यास तयार आहे. सरकारकडे लपवण्यासारखे काहीही नाही," अशा शब्दांत भूमिका स्पष्ट केली आहे. आता विरोधकांनी चर्चा करायची की गोंधळ घालायचा हे ठरवावे, असे आव्हानही त्यांनी दिले. "अधिवेशन सुरू झाल्यापासून आपण संसदेत उपस्थित राहत असून आपल्या दालनातही बसत आहोत, मात्र विरोधक दोन्ही सभागृहांचे कामकाज रोखत असल्याने चर्चा कशी होणार", असा सवाल गृहमंत्र्यांनी केला तसेच विरोधकांना चर्चा करायचीच नसून कामकाज ठप्प करायचे असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

## आंबा घाटात रस्त्याला मोठ्या भेगा
### एसटीसह अवजड वाहनांची वाहतूक बंद

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

मुसळधार पावसामुळे रत्नागिरी-कोल्हापूर राष्ट्रीय महामार्गावरील आंबा घाटात रस्त्याला मोठ्या भेगा पडल्या आहेत. त्यामुळे दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. संभाव्य धोका टाळण्यासाठी आंबा घाटातून जाणारी एसटी, प्रवासी बसेस आणि सर्व प्रकारच्या अवजड वाहनांची वाहतूक पुढील आदेशापर्यंत पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. दरम्यान, हलक्या वाहनांना स्वतःची जबाबदारी घेऊन आणि नियंत्रित वेगाने प्रवास करण्यास मुभा देण्यात आली आहे.

सध्या भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून रत्नागिरी ते कोल्हापूर या टप्प्याचे चौपदरीकरणाचे काम सुरू आहे. आंबा घाट भाग हा अत्यंत तीव्र उताराचा आणि खोल दऱ्यांचा असल्याने अतिवृष्टीमुळे दरडी कोसळण्यासाठी संवेदनशील आहे. गेल्या दोन आठवड्यांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे घाटातील किमी ६९.५०० ते ६९.६०० दरम्यान डाव्या बाजूला रस्त्याला मोठ्या भेगा पडल्याचे निदर्शनास आले आहे. या ठिकाणी दोन्ही बाजूंना सुमारे १०० मीटर खोल दरी आहे. त्यामुळे रस्ता खचून जीवित वा वित्तहानी होऊ नये यासाठी तातडीचा उपाय म्हणून अवजड वाहतूक थांबवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

## विभाजन विभीषिका दिनानिमित्त पनवेलमध्ये उद्या डॉ. उदय निरगुडकर यांचा विशेष संवाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष उत्तर रायगडच्या वतीने विभाजन विभीषिका दिनानिमित्त ज्येष्ठ पत्रकार व माध्यम सल्लागार डॉ. उदय निरगुडकर यांच्या विशेष संवादाचे आयोजन पनवेलमध्ये करण्यात आले आहे. 'नेमकं काय घडलं! १९४७ची फाळणी आणि सध्याची वैचारिक फाळणी' या विषयावर इतिहास, वर्तमान आणि बदलत्या वैचारिक प्रवाहांचा वेध घेणारा हा कार्यक्रम शुक्रवारी (दि. १४) सायंकाळी ६.३० वाजता विरूपाक्ष मंगल कार्यालयात होणार आहे.



भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील १९४७ची फाळणी हा अत्यंत वेदनादायी आणि निर्णायक अध्याय आहे. फाळणीच्या काळात नेमक्या कोणत्या घटना घडल्या, त्यामागील सामाजिक व राजकीय परिस्थिती काय होती, त्याचे देशावर झालेले दूरगामी परिणाम तसेच आजच्या काळातील बदलते वैचारिक प्रवाह याबाबत डॉ. उदय निरगुडकर आपल्या अभ्यासपूर्ण मांडणीतून संवाद साधणार आहेत.

या विषयाच्या माध्यमातून इतिहासाकडे वस्तुनिष्ठ आणि चिकित्सक दृष्टिकोनातून पाहण्याबरोबरच वर्तमानातील वैचारिक घडामोडी समजून घेण्याची संधी उपस्थितांना मिळणार आहे. विशेषतः युवा पिढीने इतिहास समजून घेताना त्यातील विविध पैलूंचा अभ्यास करणे आवश्यक असून या संवादातून त्यांना विचारांना नवी दिशा आणि दृष्टिकोनाला नवी प्रगल्भता मिळेल. या विशेष कार्यक्रमाला पत्रकार, माध्यम क्षेत्रातील प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी, युवा तसेच इतिहास आणि सामाजिक-राजकीय विषयांमध्ये रूची असलेल्या नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भाजप उत्तर रायगडच्या वतीने करण्यात आले आहे.



# रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुनर्वसनासाठी फिरते पथक योजना -मंत्री आदिती तटकरे

## प्रभावी अंमलबजावणीसाठी संवेदनशीलतेने काम करण्याचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

बाल भिक्षेकरी समस्येचे समूळ उच्चाटन करून या बालकांच्या पुनर्वसनासाठी राबविण्यात येत असलेली फिरते पथक योजना जलदगतीने कार्यान्वित करावी. यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, असे निर्देश महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.



महिला व बाल विकास मंत्री तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात यासंदर्भात बैठक झाली. यावेळी महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. महिला व बाल विकास मंत्री तटकरे म्हणाल्या, रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुनर्वसनासाठी राज्यात फिरते पथक योजना कायमस्वरूपी सुरू करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. राज्यातील २८ महानगरपालिका क्षेत्रांमध्ये प्रत्येकी एक पथक, तसेच बृहन्मुंबई शहर, मुंबई उपनगर पूर्व आणि मुंबई उपनगर पश्चिम यासाठी प्रत्येकी एक पथक, अशी एकूण ३१ फिरती पथके कार्यान्वित करण्यात येणार आहेत. या पथकांच्या निवड प्रक्रियेसह आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करून योजना प्रत्यक्ष कार्यान्वित करावी, असे निर्देश मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.

रस्त्यावर राहणाऱ्या बालकांचा शोध घेणे, त्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक उपाययोजना करणे, यासाठी ही पथके महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. बालकांच्या हिताशी संबंधित असलेल्या या योजनेची अंमलबजावणी करताना अधिकाऱ्यांनी संवेदनशीलता आणि जबाबदारीने काम करावे. प्रत्येक बालकाला सुरक्षितता, संरक्षण आणि पुनर्वसनाची संधी मिळेल, यासाठी यंत्रणेने प्रभावीपणे काम करावे, असेही मंत्री तटकरे यांनी स्पष्ट केले.

# पनवेलमधील शाळांमध्ये हर घर तिरंगा अभियानांतर्गत देशभक्तीपर उपक्रम




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताच्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील शाळांमध्ये आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध देशभक्तीपर उपक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रध्वजाबद्दल आदर, राष्ट्रप्रेम आणि देशभक्तीची भावना वृद्धिंगत व्हावी, या उद्देशाने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.आज पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील चार शाळांमध्ये एकूण सहा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये रांगोळी स्पर्धा, तिरंगा रॅली आणि प्रदर्शनाचा समावेश होता.

लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल, कामोठे येथे तिरंगा रॅली, रांगोळी स्पर्धा आणि प्रदर्शन अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, माजी भारतीय नौदल अधिकारी भूषण चंद्रकांत पाटील तसेच 'फिट इंडिया' पुरस्कारप्राप्त सामाजिक कार्यकर्ते पुरणसिंग उपस्थित होते. सेंट जोसेफ हायस्कूल, नवीन पनवेल येथे रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका फरझाना तुंगेकर आणि पर्यवेक्षिका निलोफर चँडले यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

सी.के.टी. स्कूल, नवीन पनवेल येथेही रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक कैलास म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर विषयांवर आकर्षक रांगोळ्या साकारल्या. एमएनआर स्कूल ऑफ एक्सलन्स, कामोठे येथे रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. डॉ. महेश कवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

'हर घर तिरंगा' अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना राष्ट्रध्वजाचे महत्त्व, स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास आणि देशाप्रती असलेली जबाबदारी यांची जाणीव करून देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे या अभियानाला शाळा स्तरावर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

# पनवेलचे मंदार भिडे यांना सुगम संगीतासाठी 'ए ग्रेड' गायकाचा मान ; आकाशवाणी मुंबईकडून कामगिरीची दखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील गायक अनिरुद्ध (मंदार) भिडे यांना ऑल इंडिया रेडिओ, आकाशवाणी मुंबईकडून सुगम संगीतासाठी 'ए ग्रेड' दर्जा प्राप्त झाला आहे. आकाशवाणीच्या माध्यमातून संगीत क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या भिडे यांच्या कलात्मक गुणवत्तेला आणि गायनातील सातत्यपूर्ण य ोगदानाला मिळालेली ही पावती मानली जात आहे.



या सन्मानामुळे आपल्याला अत्यंत आनंद आणि समाधान मिळाले असून यापुढील संगीतप्रवासासाठी नवी ऊर्जा व प्रेरणा मिळाल्याची भावना मंदार भिडे यांनी व्यक्त केली.

या यशाबद्दल आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

या यशामागे गुरू पं. यशवंत देव आणि पं. नारायण बोडस यांचे अमूल्य मार्गदर्शन लाभल्याचे सांगत अनिरुद्ध (मंदार) भिडे यांनी गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त केली तसेच वडील विश्वास भिडे आणि आई वृषाली भिडे यांनी दिलेले संस्कार, आशीर्वाद, प्रोत्साहन आणि सातत्यपूर्ण पाठिंबा हा आपल्या संगीतप्रवासाचा भक्कम आधार असल्याचे नमूद केले. त्यांच्या संगीतप्रवासात पत्नी अश्विनी हिचीही महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. याशिवाय कुटुंबीय, मित्र-मैत्रिणी, सहकारी कलाकार आणि विविध क्षेत्रातील हितचिंतकांनी वेळोवेळी दिलेले प्रोत्साहन व शुभेच्छा यांचाही त्यांनी उल्लेख केला.

'ए ग्रेड' हा दर्जा माझ्यासाठी केवळ सन्मान नाही, तर संगीत अधिक मनापासून शिकत राहण्याची, सातत्याने स्वतःमध्ये सुधारणा करण्याची आणि संगीताची सेवा अधिक निष्ठेने करत राहण्याची प्रेरणा आहे. हा सन्मान माझ्यासाठी आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण असला, तरी त्याचबरोबर अधिक जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे, अशी प्रतिक्रिया मंदार भिडे यांनी व्यक्त केली.

आकाशवाणी मुंबईकडून सुगम संगीतासाठी 'ए ग्रेड' गायकाचा मान मिळाल्याबद्दल संगीत क्षेत्रातील मान्यवर, रसिक, कलाकार, मित्रपरिवार आणि शुभचिंतकांकडून भिडे यांचे अभिनंदन केले जात आहे.

# वरप येथे अमली पदार्थाचा साठा जप्त

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील वरप येथे वडखळ पोलिसांनी कारवाई करत एका ७८ वर्षीय व्यक्तीकडून सुमारे १२ हजार २५० रुपये किमतीचा २४५ ग्रॅम गांजा जप्त केला आहे.

ही कारवाई मंगळवारी पहाटेच्या सुमारास करण्यात आली. आरोपीच्या राहत्या घराच्या शेडमध्ये काळपट व हिरवट रंगाची पाने, फुले व फळे असलेला, ओलसर स्वरूपाचा आणि उग्र वास येणारा वनस्पतीजन्य पदार्थ आढळून आला. तपासणीअंती तो गांजा असल्याचे निष्पन्न झाले. एकूण २४५ ग्रॅम वजनाचा गांजा, किंमत १२,२५० रुपये, असा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

सदर आरोपी लक्ष्मण महादू मनवे (वय ७८) वरप, ता. पेण, येथील रहिवासी आहे. आरोपीने हा गांजा स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगल्याचा पोलिसांचा आरोपं आहे.

याप्रकरणी वडखळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय जाधव करीत आहेत.

# खारघरमधील रामशेठ ठाकूर महाविद्यालयात राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, खारघर येथे भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय ग्रंथपाल दिन बुधवार, दि.१२ जून रोजी सकाळी ग्रंथालय विभागामध्ये उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, ग्रंथालयाचे महत्त्व अधोरेखित करणे तसेच ज्ञानसंपादनाच्या प्रक्रियेत ग्रंथपालांची भूमिका अधोरेखित करणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता. कार्यक्रमाची सुरुवात प्रा.पूजा लांजेकर ग्रंथालय समिती समन्वयक यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. सदर कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, ग्रंथपाल, ग्रंथालय कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.समाधान बेहेरे यांनी राष्ट्रीय ग्रंथपाल दिनाचे महत्त्व विशद करताना, "ग्रंथालय हे केवळ पुस्तके ठेवण्याचे ठिकाण नसून ज्ञान, विचार आणि संशोधनाचे केंद्र आहे,"असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी नियमितपणे ग्रंथालयाचा वापर करावा, विविध विषयांवरील पुस्तके व संदर्भग्रंथांचे वाचन करावे आणि डिजिटल साधनांसोबतच मुद्रित साहित्याचीही सांगड घालावी, असे आवाहन करण्यात आले. तसेच ग्रंथालयाच्या विविध सुविधांची माहिती देण्यात आली.

विद्यार्थ्यांनी या उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपल्या आवडत्या पुस्तकांविषयी माहिती व अनुभव व्यक्त केले. महाविद्यालयाच्या ग्रंथालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाशी संबंधित साहित्याबरोबरच स्पर्धा परीक्षा, संशोधन, साहित्य लेखन तसेच विविध समकालीन विषयांवरील संदर्भसाहित्य उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात ग्रंथालयाची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

बदलत्या डिजिटल युगात ग्रंथपालांची भूमिका अधिक व्यापक झाली असून विद्यार्थ्यांना योग्य माहितीपर्यंत पोहोचविणे, माहितीचे मूल्यमापन करण्याची क्षमता विकसित करणे आणि वाचनसंस्कृती रुजविणे ही ग्रंथालयाची महत्त्वाची जबाबदारी असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

# भिवपुरी-कर्जतदरम्यान मालगाडीच्या बिघाडाने रेल्वेसेवा विस्कळीत



**नेरळ : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या भिवपुरी रोड आणि कर्जत रेल्वे स्थानकादरम्यान मालगाडीच्या ब्रेक पाईपमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने बुधवार (१२ ऑगस्ट) सकाळच्या सुमारास रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली. या बिघाडाचा परिणाम कर्जत-मुंबई दिशेने धावणाऱ्या प्रवासी गाड्यांसह डाउन मार्गावरील मेल-एक्सप्रेस गाड्यांवरही झाला. त्यामुळे कर्जत आणि मुंबईकडे प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे मोठे हाल झाले.

सकाळी सुमारे ११.३५ वाजता भिवपुरी रोड आणि कर्जत स्थानकादरम्यान किमी ९६.०७/०८ येथे पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या मालगाडीच्या ब्रेक पाईपमध्ये बिघाड होऊन पाईप फुटला. त्यामुळे मालगाडी मार्गातच थांबली. परिणामी डाउन मार्गावरील रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला.

कर्जतच्या दिशेने जाणारी लोकल भिवपुरी रोड स्थानकात थांबविण्यात आली,तर त्या पाठोपाठ येणारी नेरळ स्थानकात थांबून राहिली, मुंबई कडे जाणाऱ्या प्रवाशांची गैरसोय कमी करण्यासाठी नेरळ स्थानकात थांबून राहिलेली ट्रेन १२ वाजून १६ मिनिटाच्या सुमारास मुंबई दिशेने रवाना झाली तर भिवपुरी रोड येथूनच दुपारी १२.वाजून ३२ मिनिटाच्या सुमार मुंबई सीएसएमटीच्या दिशेने एक लोकल रवाना करण्यात आली. दुसरीकडे नेरळ आणि वांगणी परिसरातही काही मालगाड्या थांबवून ठेवण्यात आल्या होत्या. काही लांब पल्ल्याच्या गाड्यांच्या वाहतुकीवरही या बिघाडाचा परिणाम झाला.


दरम्यान, रेल्वेच्या तांत्रिक विभागाने युद्धपातळीवर काम करत मालगाडीच्या ब्रेक पाईपची दुरुस्ती दुपारी १ वाजता पूर्ण केली. त्यानंतर मालगाडी पुण्याच्या दिशेने रवाना करण्यात आली.

# पावसाच्या प्रचंड प्रवाहात तुकसईचा पूल खचला ; चार गावाचा संपर्क धोक्यात

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील तुकसई गावातील नदीवरील सुमारे ४५ ते ५० फूट लांबीचा जीर्ण व धोकादायक पूल बुधवारी सकाळी पावसाच्या पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे खचला. पुलाच्या बाजूच्या संरक्षक भिंती, खांब तसेच तळभाग मोठ्या प्रमाणात खचले असून पुलाच्या संरचनेला मोठे तडे गेले आहेत.

यामुळे या मार्गावरील वाहतूक धोकादायक बनली असून गंभीर अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. पुलाची दुरावस्था लक्षात घेऊन ग्रुप ग्रामपंचायत तुकसईने जिल्हा परिषदेकडे अनेकदा पत्रव्यवहार करून दुरुस्तीची मागणी केली होती. मात्र दुरुस्तीच्या कामाला विलंब झाला. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे डोंगरदऱ्यांतून मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह पुलाखालून जात होता. अखेर पाण्याचा वाढता प्रवाह आणि पुलाची जीर्ण अवस्था यामुळे पूल खचला. या पुलावरून तुकसई गावासह तूरमाल ठाकूरवाडी, चिंबोडे ठाकूरवाडी आणि आदिवासी वाडीतील नागरिकांची दररोज ये-जा सुरू असते. शालेय विद्यार्थी, रुग्ण, शेतकरी, कामगार, नोकरदार नागरिकांसाठी हा महत्त्वाचा मार्ग होता.



# लाडिवली, सारसई येथील मोबाईल टॉवरवरून ४८ बॅटऱ्या लंपास

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

लाडीवली आणि सारसई येथील इंडस मोबाईल टॉवरवरून अज्ञात चोरट्यांनी एक्साईड कंपनीच्या एकूण ४८ बॅटऱ्या चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस चोरट्यांचा शोध घेत आहेत.

याबाबत सविस्तर हकीकत अशी की, पुणे येथील 'बिफोरएस सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड'या कंपनीच्या देखरेखीखाली पनवेल तालुक्यात 'इंडस मोबाईल टॉवर कंपनी'चे टॉवर कार्यरत आहेत.

अज्ञात चोरट्यांनी लाडीवली येथील लोना कंपनीच्या बाजूला असलेल्या टॉवर क्रमांक १०५३७८१ मधून आणि सारसई येथील टोकाची वाडी येथील टॉवर क्रमांक १०५३९४४ मधून एक्साईड कंपनीचे एकूण ४८ बॅटरी सेल्स चोरून नेले. या चोरीला गेलेल्या सर्व बॅटऱ्यांची एकूण किंमत १४ हजार ४०० रुपये असल्याचे तक्रारीत नमूद केले आहे.

या चोरीच्या घटनेप्रकरणी कंपनीचे अधिकारी रोशन मुरलीधर मांडे (रा. रोहा) यांनी रसायनी पोलीस ठाण्यात रीतसर फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून रसायनी पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार एच. पी. म्हात्रे करत असून, रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली तपास यंत्रणा अधिक गतिमान करण्यात आली आहे.

# खारघर सेंट्रल पार्कजवळ भरदिवसा डेब्रिज टाकणारा डंम्पर पकडला

**पनवेल : वार्ताहर**

मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानीकारक असलेले डेब्रिज, माती, कचरा, रॅबीट अनधिकृतपणे नवी मुंबईत टाकणाऱ्यांविरोधात सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सिडकोच्या दक्षता पथकांनी धडक कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. खारघर से. २२ सेंट्रल पार्क जवळ गोल्फ कोर्ससमोर सिडकोच्या मोकळ्या जागेत डेब्रीज टाकत असलेला एक डम्पर सिडकोच्या पथकांनी नुकताच पकडला. याप्रकरणी डेबीज टाकतांना मिळून आलेल्या डंपरचालकाविरोधात खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पथकाने सदरचा डंपर जप्त केला असून याबाबत चालक विलास रणशुर याच्याविरोधात खारघर पोलीस ठाण्याते गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पनवेल शहर पोलीस ठाण्यात पोलीस पाटलांची बैठक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोलीस पाटलांची बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी त्यांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस पाटलांनी प्रशासनाशी समन्वय ठेवून कार्य करण्याचे आवाहन करत विविध विषयांवर मार्गदर्शन केले.बैठकीदरम्यान पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील पोलीस पाटलांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांचे भारतीय संविधानाची उद्देशिका भेट देऊन तसेच पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाचे सहसचिव कुणाल लोंढे, पनवेल तालुका पोलीस पाटील संघाचे अध्यक्ष प्रमोद नाईक, उपाध्यक्ष प्रदीप पाटील, सचिव विजय खुटले, खजिनदार निलेश गायकर, माजी अध्यक्ष मिलिंद पोपेटा, तसेच मीनाक्षी पाटील (कुंडेवहाळ), सुगंधा पारधी (सांगुर्ली), एकनाथ पाटील (पळस्पे), वसंत पाटील (वडवली), भरत पाटील (कुडावे) आणि दिलीप खुटले (चिंचवण) यांच्यासह परिसरातील अनेक पोलीस पाटील उपस्थित होते.

पान १ वरुन

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर आवश्यक

विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील खेळांसाठी सक्षम करण्यासाठी योग्य आराखडा बनवून काम करण्याची गरज असल्याचे सांगतानाच, यासाठी महापालिकेचा निधी वापरून किंवा जिथे निधी कमी पडेल तिथे विविध संस्थांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून विद्यार्थ्यांच्या क्रीडा विकासावरही भर देण्याचे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी केले.

# ‘स्वरतिरंगा’मधून पनवेलकरांनी अनुभवला देशभक्तीचा रोमांचकारी स्वरानुभव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताच्या स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर ‘हर घर तिरंगा’ अभियानांतर्गत ‘वंदे मातरम्’च्या १५० वर्षांच्या स्मरणानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या वतीने ‘स्वरतिरंगा तरुण स्वरांतून राष्ट्रभक्तीचा बुलंद जयघोष!’ या संकल्पनेवर आधारित विशेष देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन आज आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले. या कार्यक्रमाला नागरिक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.





कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर नितीन जयराम पाटील होते. यावेळी सभागृहनेते अॅड. प्रकाश बिनेदार, महापालिकेचे नगरसेवक–नगरसेविका, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त अभिषेक पराडकर, उपायुक्त मंगला माळवी, उपअभियंता विलास चव्हाण, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना महापौर नितीन पाटील म्हणाले की, भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्ञात स्वातंत्र्यसैनिकांप्रमाणेच अनेक अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांनीही आपल्या प्राणांचे बलिदान दिले. त्यांच्या त्यागातून निर्माण झालेली राष्ट्रभक्तीची भावना विविध उपक्रम आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे.

सभागृहनेते अॅड. प्रकाश बिनेदार म्हणाले की, देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. आजही देशाच्या सीमेचे रक्षण करणारे सैनिक आपल्या जीवाची पर्वा न करता देशसेवा करत आहेत. या सर्वांच्या त्यागाचे स्मरण ठेवून नागरिकांनी स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी आपल्या घरावर तिरंगा ध्वज फडकवावा, असे आवाहन त्यांनी केले. परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली ‘हर घर तिरंगा’ अभियानांतर्गत महापालिका क्षेत्रात राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आयोजित आणि ‘देवकी मीडिया’ प्रस्तुत ‘स्वरतिरंगा’ या कार्यक्रमात झी हिंदी सारेगमप फेम मिथिला माळी, उत्कर्ष चंदनशिवे, समृद्धी जाधव, निर्जला वाल्मिकी आणि अमोल चव्हाण या युवा गायक–गायिकांनी आपल्या सुरेल आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. सेलिब्रिटी अँकर विनीत देव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

‘वंदे मातरम्’च्या १५० वर्षांच्या स्मरणानिमित्त आयोजित या कार्यक्रमातून नव्या पिढीमध्ये राष्ट्रभक्तीची भावना अधिक दृढ करण्याचा संदेश देण्यात आला. ‘ऐ मेरे वतन के लोगो’, ‘जहाँ डाल डाल पर’, ‘मेरे देश की धरती’, ‘आय लव्ह माय इंडिया’, ‘जय हो’, ‘संदेसे आते हैं’ यांसह अनेक देशभक्तीपर गीतांनी कार्यक्रमात रंगत आणली. या गीतांच्या सादरीकरणाने रसिकांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. ‘मेरे देश की धरती’ या गीतावरील नृत्याविष्काराने उपस्थितांची विशेष दाद मिळवली. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर पनवेलकरांना या कार्यक्रमाच्या माध्यमातून एक वेगळा आणि उत्साहपूर्ण सांगीतिक अनुभव मिळाला. कार्यक्रमासाठी अत्याधुनिक ध्वनी व प्रकाशयोजनेचा वापर करण्यात आला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पनवेल महानगरपालिकेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर यांनी केले. ‘हर घर तिरंगा’ अभियानांतर्गत आयोजित ‘स्वरतिरंगा तरुण स्वरांतून राष्ट्रभक्तीचा बुलंद जयघोष!’ या कार्यक्रमास नागरिक, विद्यार्थी आणि रसिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

# खारघरमध्ये ज्वेलर्स दुकान फोडून १.६४ कोटींचा ऐवज लंपास

**पनवेल : वार्ताहर**

खारघर सेक्टर १२ येथील एका ज्वेलर्स दुकानात मध्यरात्री शटर उचकटून अज्ञात चोरट्यांनी तब्बल १ कोटी ६४ लाख ३४ हजार ९७६ रुपयांचा ऐवज लंपास केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या चोरीमध्ये हिरे, सोन्याचे आणि प्लॅटिनमचे दागिने तसेच रोख रक्कम चोरीला गेल्याने व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खारघर सेक्टर १२मधील सीआयएसएफ रोडवरील उत्सव चौक परिसरातील साई कृपा प्रिमायसेस इमारतीत कॅन्डीअर लाईफस्टाईल ज्वेलर्स हे दुकान आहे. १० ऑगस्ट रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास दुकान बंद करण्यात आले होते. मंगळवारी (११ ऑगस्ट) सकाळी साडेदहाच्या सुमारास दुकान उघडण्यासाठी आल्यानंतर चोरी झाल्याचे निदर्शनास आले.

चोरट्यांनी दुकानाचे शटर हत्याराच्या साहाय्याने उचकटून आत प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी दुकानातील ६८ लाख ९१ हजार ७७९ रुपये किमतीचे हिऱ्यांचे १३९ दागिने, १५ लाख ५७ हजार ३७९ रुपये किमतीचे सोन्याचे २७ दागिने, ७९ लाख ५५ हजार ८१७ रुपये किमतीचे प्लॅटिनमचे ४८ दागिने तसेच कॅश काउंटरमधील ३० हजार रुपयांची रोकड असा एकूण १ कोटी ६४ लाख ३४ हजार ९७६ रुपयांचा ऐवज लंपास केला.

घटनेची माहिती मिळताच खारघर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. श्वानपथक आणि फिंगरप्रिंट तज्ज्ञांच्या मदतीने घटनास्थळाची पाहणी करण्यात आली असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू आहे.या प्रकरणी दुकानाचे फिर्यादी नितीन सुधाकर वांदे यांच्या तक्रारीवरून खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अद्याप कोणालाही अटक झालेली नाही. सहायक पोलीस आयुक्त विक्रम कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जोशी, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक साईप्रकाश चन्ना यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाचा आढावा घेतला. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष भालेराव करीत आहेत.

# रिक्षाचालकाला केली हेल्मेटने मारहाण

**पनवेल :** रिक्षा थांबवल्याचा राग मनात धरून स्कुटीवरील दोघांनी रिक्षाचालकाला दगडाने आणि हेल्मेटने मारहाण केल्याची घटना बालाजी कॉम्प्लेक्स समोरील रोड कळंबोली येथे घडली. या प्रकरणी सुजान खान, कौशल खान (राहणार तळोजा) यांच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

रिक्षाचालक ऋषिकेश दिनकर राठोड हे त्याचे रिक्षा मुंब्रा पनवेल हायवेने बालाजी कॉम्प्लेक्स समोरील रोड कळंबोली येथे प्रवासी भाडे सोडण्यासाठी थांबले होते. पाठीमागे पिकअप वाहन आणि त्याच्या पाठीमागील स्कुटी क्रमांक ०३ इवाय १४७३ ने ठोकर मारल्याने रिक्षा चालक यांना स्कुटी वरील आरोपी सूजान खान आणि कौशल खान यांनी शिवीगाळ केली आणि दगडाने आणि हेल्मेटने मारहाण करून त्यांना जखमी केले.





पनवेल : महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क च्या सभापतीपदी रवी जोशी आणि प्रभाग समिती ड च्या सभापतीपदी अजय बहिरा यांची निवड झाल्याबद्दल त्यांनी भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सचिव तथा आमदार प्रशांत ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान आमदार प्रशांत ठाकूर यांनी नवनिर्वाचित सभापती रवी जोशी आणि अजय बहिरा यांचे पुष्पगुच्छ देऊन विशेष अभिनंदन केले तसेच त्यांच्या पुढीलव टचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी नगरसेवक विकास घरत, प्रदीप भगत, भाऊ भगत, रवी गोवारी, रवी म्हात्रे, जयेंद्र जोशी, प्रभाग२० चे अध्यक्ष रघुनाथ बहिरा, जगदीश परदेशी, रुपेश परदेशी, सचिन चिखलीकर, बाळाराम चिखलीकर,विकास म्हसकर, नरेश घरत, भारत बहिरा, महेश राऊत, राम सारंग, रोहित शिवकर, चेतन शहा, अमर पाटील, दिनेश कोनकर आदी उपस्थित होते.

पनवेल : भाजपचे वावंजे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष प्रकाश खैरे यांचा वाढदिवस बुधवारी साजरा झाला. यानिमित्त त्यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी अरुण चोरमेकर, विलास खैरे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.





# इनरव्हील क्लब ऑफ पनवेलतर्फे व्यसनांना नकार देत निरोगी जीवनशैलीचा संदेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांमध्ये व्यसनाधीनतेचे वाढते प्रमाण, त्याचे दुष्परिणाम तसेच विविध प्रकारच्या व्यसनांपासून दूर राहण्याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने इनरव्हील क्लब ऑफ पनवेल यांच्या वतीने चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यम विद्यालय ,नविन पनवेल या शाळेत “Say No to Drugs” या विषयावर विशेष जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वाती काळे यांनी केले व प्रमुख पाहुण्यांचा परिचय .वर्षाताई ठाकूर यांनी करून दिला. या कार्यक्रमाला इनरव्हील क्लब ऑफ पनवेल च्या अध्यक्षा डॉ. अमृता नाईक तसेच पी डी सी डॉ. शोभना पालेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रमुख मानसोपचारतज्ज्ञ डॉ. शिल्पा परहार यांनी विद्यार्थ्यांना व्यसनांचे स्वरूप, व्यसनाधीनतेमागील कारणे आणि त्याचे शरीर व मनावर होणारे गंभीर परिणाम याबाबत मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनातून मानसोपचारतज्ज्ञ डॉ . शिल्पा परहार यांनी चांगल्या व वाईट सवयी, व्यसनाधीनता आणि अंमली पदार्थांचे दुष्परिणाम यावर सविस्तर माहिती दिली.

विशेषतः पान मसाला, गुटखा, ड्रग्स, यांसारख्या तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे होणारे आरोग्यविषयक धोके विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. व्यसनाधीनतेमध्ये डोपामिनची भूमिका, तसेच अल्कोहोल आणि ओपिऑइड्सच्या व्यसनाची लक्षणे याबाबतही विद्यार्थ्यांना शास्त्रीय पद्धतीने माहिती देण्यात आली. केवळ अंमली पदार्थच नव्हे, तर व्हिडिओ गेम, मोबाईल आणि इतर डिजिटल माध्यमांचे अतिवापरातून निर्माण होणाऱ्या व्यसनाधीनतेबाबतही विद्यार्थ्यांना सावध करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्या, तसेच इनरव्हील क्लब च्या सदस्या वर्षाताई ठाकूर आणि इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या संजीवनी मालवणकर, आणि शिल्पा चांदणे यांच्यासह इतर सदस्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना “व्यसनाची सुरुवात एका छोट्या चुकीच्या निर्णयातून होऊ शकते; मात्र त्याचे परिणाम आयुष्यभर भोगावे लागू शकतात” हा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.




## सीकेटी शाळेमध्ये ऑगस्ट क्रांतीदिन उत्साहात साजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्फूर्तीदायी ठरलेल्या या दिवसाची आठवण तसेच नव्या पिढीला क्रांतिकारकांच्या त्यागाची जाणीव रहावी यासाठी दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी क्रांतीदिन साजरा केला जातो. या दिवशी १९४२ साली महात्मा गांधीजींनी 'छोडो भारत' व 'करेंगे या मरेंगे' चा नारा दिला होता. यामुळे संपूर्ण देश पेटून उठला होता. आजच्या काळातील विद्यार्थ्यांना या दिवसाचे महत्व कळावे आणि हुतात्म्यांना आदरांजली वहावी या हेतूने सी के टी इंग्रजी विद्यालयात हा दिवस उत्साहामध्ये साजरा करण्यात आला.

विद्यालयातील पिवळा कुल आणि इयत्ता ७ वी ब च्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. इयत्ता सातवीच्या अदिती केणी आणि रेवती अनभुले या विद्यार्थिनींनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमा मध्ये पिवळ्या कुलाच्या प्रमुख शशिकला पाटील यांनी आपल्या भाषणाद्वारे आजच्या दिवसाचे महत्व सांगितले. या कार्यक्रमांमध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.विद्यार्थ्यांनी यावेळी भाषण ,देशभक्तीपर गाणे आणि नाटक सादर केले. पर्यवेक्षिका नीरजा मॅडम यांनी ऑगस्ट क्रांती दिन म्हणजे नेमके काय? हे विद्यार्थ्यांना आपल्या भाषणातून सांगितले.




श्रावण सुरू झाला की, कविमन आपोआपच श्रावणधारांसारखं बहरू लागतं. नवनवीन कल्पना त्यांच्या डोक्यातून बाहेर पडतात आणि मग दरवर्षी पावसावरील कवितांचा जणू पाऊसच पडतो. यासाठी आम्ही सर्व कवींना आग्रहानं निमंत्रित करीत आहोत. मग विचार कसला करता, उचला आपली लेखणी आणि लिहा पाऊस कविता. आम्ही त्यास यथायोग्य प्रसिद्धी देऊ...

श्रावण संपेपर्यंत आपण स्वत: शब्दबद्ध केलेल्या कविता ‘रामप्रहर’मध्ये दररोज एक याप्रमाणे (एका कवीची एकच कविता) येत्या सोमवारपासून प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

कवींनी आपली अप्रकाशित कविता स्वत:च्या छायाचित्रासह ‘रामप्रहर’कडे टाईप करून पाठवावी. त्या कवितेला ‘श्रावणधारा’ या सदराखाली यथायोग्य प्रसिद्धी देण्यात येईल.

–मुख्य संपादक

पत्ता : दै. रामप्रहर, अस्पायर प्राईड,
गाळा नं. ४, रूपाली चौक, पनवेल ४१०२०६, रायगड.
E.mail : ramprahar@gmail.com
व्हॉट्सअॅप क्रमांक ७७३८१०६००९

## संपादकीय

# चर्चा हवी की व्यत्यय?

निव्वळ संसदेत गदारोळ निर्माण करून कामकाजात व्यत्यय आणणे हे प्रभावी विरोधीपक्षाचे लक्षण नव्हे. सरकारला तथ्य आणि तर्काच्या आधारे चर्चेदरम्यान घेरणे ही विरोधकांची जबाबदारी नाही का?

**संसदेचे कामकाज चालणे ही केवळ सत्ताधाऱ्यांची नव्हे तर विरोधकांचीही जबाबदारी आहे. मात्र संसदेच्या सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनातील गोंधळ पाहता आपली ही मूलभूत जबाबदारीच काही विरोधीपक्ष विसरले आहेत की काय असा प्रश्न पडावा असे चित्र दिसते आहे. नीट पेपरफुटी आणि त्यासंदर्भातील जंतरमंतर येथील आंदोलनादरम्यान आंदोलक विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जवरून विरोधकांनी सध्याच्या अधिवेशनात सभागृहांमध्ये सातत्याने गोंधळ घातला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी यासंदर्भात उत्तर द्यावे अशी विरोधकांची मागणी राहिली आहे. सरकार प्रत्येक गोष्टीवर चर्चेसाठी तयार आहे असे म्हणत, विरोधकांनी फक्त संसदेचे कामकाज चालू द्यावे असे अखेर बुधवारी अमित शहा यांना माध्यमांसमोर येऊन सांगावे लागले. देशाची संसद हे धोरणांवर निर्णय घेण्याचे, जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करण्याचे आणि सरकारला जाब विचारण्याचे सर्वोच्च लोकशाही व्यासपीठ आहे. हे काही केवळ सत्ताधारी आणि विरोधकांमधील राजकीय शक्तिप्रदर्शनाचे व्यासपीठ नाही. लोकशाहीत विरोधकांना सरकारला प्रश्न विचारण्याचा पूर्ण अधिकार आहे. पोलिस कारवाईवर प्रश्न उपस्थित करणे, विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सरकारकडून स्पष्टीकरण मागणे किंवा प्रशासनाच्या भूमिकेची चौकशी करणे हे सर्व लोकशाहीचे अविभाज्य भाग आहेत. पण प्रश्न विचारण्याचा अधिकार आणि संसदेचे कामकाज ठप्प करण्याचा अधिकार यात मात्र मोठा फरक आहे हे विरोधकांना ध्यानात घ्यावे लागेल. प्रश्न विचारायचे असतील तर सभागृह चालले पाहिजे आणि उत्तर ऐकायचे असेल तर चर्चेला सामोरे जाण्याची तयारीही हवी. विरोधकांनी अमित शहा यांच्या निवेदनाची मागणी केल्यानंतर संसदीय कामकाजमंत्री किरण रिजिजू यांनी सरकार सर्व संबंधित मुद्यांवर चर्चा करण्यास तयार असल्याचे स्पष्ट केले होते. बुधवारी तर स्वतः अमित शहा यांनी विरोधकांना चर्चेचे खुले आव्हान दिले. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाशी संबंधित प्रत्येक पैलूवर संसदेत चर्चा करण्यास सरकार तयार असून विरोधकांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे पत्र द्यावे आणि दुपारी तीन वाजल्यापासून चर्चा सुरू करता येईल असे त्यांनी सांगितले. इतकेच नव्हे तर ही चर्चा दुसऱ्या दिवशी दुपारी तीन वाजेपर्यंत सुरू ठेवण्याची तयारी असल्याचेही शहा यांनी स्पष्ट केले. सरकारला काहीही लपवायचे नाही याचाही त्यांनी स्पष्ट उच्चार केला. चर्चा करण्यासाठी सरकार एवढी संधी देत असताना सरकार चर्चेपासून पळ काढते आहे असे विरोधक कसे काय म्हणू शकतात? चर्चा करण्याऐवजी विरोधकच सभागृह चालू देत नाहीत या सत्ताधाऱ्यांच्या आरोपाकडे मग गांभीर्याने पहावे लागते. आधी 'उत्तर हवे' अशी मागणी करणाऱ्या काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शहा यांच्या चर्चेच्या प्रस्तावानंतर मात्र केवळ भाषण नव्हे तर उत्तरदायित्व हवे ही नवीन मागणी केली. चर्चेदरम्यान सरकारला कठोर प्रश्न विचारून नंतर राहुल गांधी यांना उत्तरदायित्वाविषयी बोलता आले असते. विरोधकांना निव्वळ वाद निर्माण करून कामकाजात व्यत्यय आणायचा आहे का असा प्रश्न यामुळे कुणालाही पडू शकतो. संसदेचे कामकाज ठप्प करून सरकारला घेरल्याचा आभास निर्माण करण्यापेक्षा संसदेसारख्या सर्वोच्च व्यासपीठावरील चर्चेदरम्यान सरकारला उत्तरदायी ठरवणे लोकशाहीला अधिक साजेसे ठरेल.**

# पवित्र श्रावण मासाचे महत्त्व...

श्रावण मासारंभ १३ ऑगस्टपासून होत आहे. आषाढी एकादशी ते कार्तिक एकादशी या चार महिन्यांच्या काळात भगवान श्री विष्णू महासागरात शेषशय्येवर योगनिद्रा घेत असल्याने सृष्टीचा भार भगवान शिव शंकरांवर पडतो. त्यामुळे या दिवसांत शिव उपासनेला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. श्रावण मसाविषयी शास्त्रीय माहिती या लेखातून जाणून घेऊया...



'भगवान श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या 'श्रीमद्‌भगवत्गीते'तील संवादात भगवान श्रीकृष्णाने सांगितले आहे, 'मासांमध्ये (महिन्यांमध्ये) मी 'मार्गशीर्ष' मास आहे. याचप्रमाणे शिव आणि सनतकुमार यांच्यामध्ये श्रावणमासाबद्दल पुढील आशयाचा संवाद झाल्याचे पुराणात म्हटले आहे. भोलेनाथ शिव म्हणतात

*द्‌वादशस्वपि मासेषु श्रावणो मेऽतिवल्लभः।*
*श्रवणार्हं यन्माहात्म्यं तेनासौ श्रवणो मतः।।*
*श्रवणर्क्षं पौर्णमास्यं ततोऽपि श्रावणः स्मृतः।*
*यस्य श्रवणमात्रेण सिद्‌धिदः श्रावणोऽप्यतः।।*

अर्थ : १२ मासांतील 'श्रावण मास' मला अतिप्रिय आहे. त्याचे माहात्म्य श्रवण करण्यास योग्य आहे. त्यामुळे त्याला 'श्रावण मास' असे म्हटले जाते. श्रावण या शब्दाची उत्पत्ती 'श्रवण' या शब्दातून झाली आहे. 'श्रवण' शब्दाचे २ अर्थ होतात. त्यांपैकी एक म्हणजे 'हिंदु पंचांगातील २२ वे नक्षत्र', असा आहे आणि दुसरा अर्थ 'श्रवण म्हणजे ऐकणे.' श्रावणात श्रवणभक्ती केल्याने सिद्‌धी प्राप्त होतात. त्यामुळेच हा मास अत्यंत पवित्र आणि शुभ मानला जातो.

हिंदु धर्मात पंचांगातील ५ अंगांपैकी 'नक्षत्र' या अंगाला अत्यंत महत्त्व आहे. त्यामुळे हिंदु कालगणनेनुसार १२ मासांची नावे ही त्या त्या मासाच्या पौर्णिमेला चंद्र ज्या नक्षत्रात असतो, त्या नक्षत्रानुसार आहेत, उदा. चैत्र मासातील पौर्णिमेला चंद्र 'चित्रा' नक्षत्रात असतो; म्हणून त्या मासाचे नाव 'चैत्र' आहे. श्रावणातील पौर्णिमेला चंद्र 'श्रवण' नक्षत्रात असतो. त्यामुळे त्या मासाचे नाव 'श्रावण' आहे. पौर्णिमेला चंद्र ज्या नक्षत्रात असतो, त्या नक्षत्राचे चैतन्य आणि ऊर्जा त्या संपूर्ण मासात अधिक प्रमाणात कार्यरत असते.

*शास्त्रानुरुक्तो बहुपुत्रमित्रः*
*सत्पात्रभक्तिः विजितारिपक्षः।*
*चेज्जन्मकाले श्रवणा हि यस्य प्रेमा*
*पुराणश्रवणे प्रवीणः ।।* जातकाभरण

अर्थ : श्रवण नक्षत्रावर जन्माला आलेला मनुष्य शास्त्रप्रेमी, अनेक मित्र असलेला, मुलाबाळांची आवड असणारा, विधायक कार्ये करणारा, शत्रूंवर विजय मिळवणारा, पुराणश्रवण आदींमध्ये रुची असलेला असतो.

हिंदु संस्कृतीचे निर्माते असणाऱ्या ऋषिमुनींना याचे सर्व ज्ञान होते. त्यामुळेच त्यांनी आपल्यावर उत्तम आणि उदात्त संस्कार व्हावेत आणि आपल्याला आवश्यक ते धर्मज्ञान सहजपणे मिळावे, यांसाठी श्रावण मासात अधिकाधिक ग्रंथ, कथावाचन, पारायण, व्रतवैकल्ये, दानधर्म इत्यादी करण्याचे मार्गदर्शन केले आहे. त्यामुळेच वर्षभर मांसाहार करणारे लोक श्रावण मासात मांसाहार पूर्णतः वर्ज्य करतात. बहुतेक घरांत श्री सत्यनारायणाची पूजा अगत्याने केली जाते. श्रावणात प्रत्येक वारानुसार व्रते, विशेष पूजा, उपवास इत्यादी गोष्टी स्त्रिया तर करतातच; पण बहुतेक पुरुषसुद्‌धा दाढी न करणे, केस न कापणे, तसेच उपवास करणे, घरात श्रीगुरुचरित्र, श्रीनवनाथ माहात्म्य, शिवलीलामृत, शिवपुराण किंवा कुठल्याही धार्मिक ग्रंथांची पारायणे इत्यादी आचारांचे पालन करतातच. त्यामुळे 'ब्रह्मांडातील ग्रह, तारे आणि नक्षत्रे यांचे मानवी जीवन किंवा चराचर सृष्टी यांवर सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम होतातच', याचाच हा पुरावा आहे. तात्पर्य काय, तर हिंदु धर्मशास्त्रातील विज्ञान समजून घेतले पाहिजे. त्यामुळे आपल्या जीवनात जे जे उत्तम, उदात्त, उन्नत, महन्मधुर, ते ते घडवण्यासाठी कटिबद्‌ध असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या मानसिकतेला या 'श्रवण' नक्षत्रामुळे आणि 'श्रावण' मासामुळे योग्य ते क्रियमाण वापरण्यासाठी भरपूर प्रमाणात बळ मिळते.

**–जगन घाणेकर**, मुंबई
(संदर्भ : सनातन डॉट ऑर्ग )

# अवयवदान सर्वश्रेष्ठ दान!

अवयवदानाच्या महत्त्वाबाबत जनजागृती करण्यासाठी आणि अवयवदानाबद्दल असलेल्या गैरसमजांची जाणीव करून देण्यासाठी दरवर्षी १३ ऑगस्ट रोजी जागतिक अवयवदान दिन साजरा केला जातो. या उदात्त कार्यक्रमात सहभागी संस्थांचे एकमेव उद्दिष्ट मुख्यतः लोकांना अधिक जीव वाचवण्यासाठी मृत्यूनंतर अवयव दान करण्याच्या महत्त्वाबद्दल प्रोत्साहित करणे आणि शिक्षित करणे हे आहे. मूत्रपिंड, हृदय, स्वादुपिंड, डोळे आणि फुफ्फुसे यासारख्या अवयवांचे दान दीर्घकालीन आजारांनी ग्रस्त लोकांचे जीवन वाचवू शकते.

अवयव दान करणे ही एक व्यक्ती, त्यांच्या संमतीने, त्यांचे अवयव कायदेशीररित्या काढून दुसऱ्या व्यक्तीला प्रत्यारोपित करण्याची परवानगी देण्याची प्रक्रिया आहे, जिथे दाता जिवंत किंवा मृत आणि जवळचा नातेवाईक असू शकतो.

अवयव निकामी होणे ही प्रमुख आजारांपैकी एक आहे, ज्यामध्ये साथीच्या रोगात आणि भूतकाळात जास्त जीव गमावले आहेत. अवयव उपलब्ध नसल्यामुळे अनेक गरजू रुग्णांना जीव गमवावा लागतो. एक उपक्रम हृदय, मूत्रपिंड, स्वादुपिंड, फुफ्फुसे, यकृत, आतडे, हात, चेहरा, ऊती, अस्थिमज्जा आणि स्टेम पेशी दान करून आठ जीव वाचवू शकतो. या वर्षी २०२४ जागतिक अवयवदान दिनाचे




घोषवाक्य आहे आज कोणाच्या तरी हसण्याचे कारण व्हा! या घोषणेचा उद्देश अवयवदानाच्या महत्त्वाच्या गरजेबद्दल जागरुकता निर्माण करणे आणि व्यक्तींना अवयवदाता बनण्याचा विचार करण्यास प्रेरित करणे हा आहे.

मृत देणगीदार जागतिक स्तरावर आणि भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये वाढत्या अवयवांची गरज कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात, कारण एक मृतदाता आठ व्यक्तींना वाचवू शकतो. रोनाल्ड ली हेरिक हे अवयवदान करणारे पहिले व्यक्ती होते. १९५४मध्ये त्यांनी त्यांची किडनी त्यांच्या जुळ्या भावाला दर्शविली आणि डॉ जोसेफ मरे हे डॉक्टर होते ज्यांनी ही यशस्वी अवयव प्रत्यारोपण प्रक्रिया पार पाडली. नंतर १९९०मध्ये अवयव प्रत्यारोपणात प्रगती केल्याबद्दल त्यांना फिजिओलॉजी आणि मेडिसिनमधील नोबेल पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले.

अवयवदान उपक्रमांबाबत, जगातील विविध भाग त्यांच्या परिस्थिती आणि क्षमतेच्या आधारे अवयवदानाचे अनभिज्ञता आणि महत्त्व हाताळतात. भारतात अवयवदानाच्या कायद्याला प्रोत्साहन देण्यासाठी २७ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय अवयव दिन साजरा करण्यात आला, जो २०१०मध्ये आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत राष्ट्रीय अवयव आणि ऊतक प्रत्यारोपण संघटनेने २०२२पर्यंत सुरू केला होता.

२०२३मध्ये ३ ऑगस्ट १९९४ रोजी भारतातील पहिल्या यशस्वी मृत–दात्याच्या हृदय प्रत्यारोपणाच्या स्मरणार्थ भारताचा अवयवदान दिवस ३ ऑगस्टला हलवण्यात आला आहे.

(साभार इंटरनेट)




## 'शाओमी'चा रिअलमी १६ एक्स ५G लॉन्च

रियलमीने आपला नवीन रिअलमी १६ एक्स ५G स्मार्टफोन भारतीय बाजारात लॉन्च केला आहे. कंपनीने हा फोन मिड–बजेट सेगमेंटमध्ये सादर केला असून Realme १६ Series मधील आतापर्यंतचा सर्वात स्वस्त मॉडेल आहे. मोठी ७०००mAh बॅटरी, १४४Hz रिफ्रेश रेट डिस्प्ले, MediaTek Dimensity ६३०० प्रोसेसर आणि IP६५ रेटिंग यांसारखी फीचर्स या फोनमध्ये देण्यात आली आहेत.



हा फोन तीन व्हेरिएंटमध्ये लॉन्च करण्यात आला आहे. दरम्यान, या फोनची सुरुवाती किंमत २५ हजार ९९९ रुपये (४ जीबी रॅम आणि १२८ जीबी स्टोरेज) इतकी आहे. तर, ६ जीबी रॅम/१२८ जीबी आणि ६ जीबी रॅम/२५६ स्टोरेज असलेल्या स्मार्टफोनची किंमत अनुक्रमे २७ हजार ९९९ रुपये आणि ३० हजार ९९९ रुपये इतकी ठेवण्यात आली आहे. हा फोन एन्ड्युरन्स ब्राऊन आणि ग्लोरी व्हाईट अशा दोन रंगात लॉन्च करण्यात आला आहे.

रिअलमी १६ एक्स ५Gची पहिली विक्री १३ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता सुरू होणार आहे. ग्राहकांना हा फोन फ्लिपकार्ट आणि रिअलमीच्या अधिकृत ऑनलाइन स्टोअरवरून खरेदी करता येईल. फोनच्या खरेदीवर कंपनी २००० रुपयांचा लॉन्च डिस्काउंट देत आहे. याशिवाय ग्राहकांना २ हजाररुपयांपर्यंतचा एक्स्चेंज ऑफर आणि १० महिन्यांपर्यंत नो–कॉस्ट ईएमआयचा पर्यायही मिळणार आहे.

रिअलमी १६ एक्स ५Gमध्ये ६.८ इंचाचा एचडी प्लस एलसीडी डिस्प्ले देण्यात आला आहे. या स्क्रीनला १४४Hz रिफ्रेश रेट आणि १२०० निट्सपर्यंत पीक ब्राइटनेस सपोर्ट मिळतो. त्यामुळे गेमिंग, व्हिडीओ पाहणे आणि सोशल मीडिया वापरताना स्मूथ अनुभव मिळण्याची अपेक्षा आहे.

या फोनमध्ये ग्राहकांना फोटोग्राफीसाठी मागील बाजूस ५० मेगापिक्सेल मुख्य कॅमेरा देण्यात आला आहे. यासोबत सेकंडरी कॅमेराही आहे. सेल्फी आणि व्हिडीओ कॉलिंगसाठी फोनमध्ये ८ मेगापिक्सेलचा फ्रंट कॅमेरा मिळतो. या फोनमध्ये ७००० एमएएच क्षमतेची बॅटरी मिळते. ही बॅटरी ४५ W फास्ट चार्जिंगला सपोर्ट करते. त्यामुळे फोनचा मोठ्या प्रमाणावर वापर करणाऱ्या ग्राहकांसाठी हा स्मार्टफोन उपयुक्त ठरू शकतो.

परफॉर्मन्ससाठी या फोनमध्ये MediaTek Dimensity ६३०० चिपसेट देण्यात आला आहे. फोनमध्ये जास्तीत जास्त ६ जीबी रॅम आणि २५६ जीबी स्टोरेज इंटरनल स्टोरेज मिळते.

# बालकवी त्र्यंबक बापूजी ठोंबरे



**निमित्त**

हिरवे हिरवेगार गालिचे – हरित तृणाच्या मखमालीचे ;त्या सुंदर मखमालीवरती – फुलराणी ही खेळत होती. बालकवींची ' फुलराणी ' ही नितांतसुंदर कविता मराठी भाषेतील काव्यसौंदर्याचे एक मनोहर शब्दशिल्प आहे. या कवितेतील कल्पकता, तिचे भाषावैभव, भावलाघव हे सगळे इतके मोहक आहे की, बालकवी म्हटल्यावर फुलराणीचीच आठवण व्हावी. बालकवी यांचा जन्म १३ ऑगस्ट १८९० रोजी खान्देशात धरणगाव येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव त्र्यंबक बापूजी ठोंबरे. बालकवी यांना चार भावंडे होती. मनुताई (जिजी), अमृतराव, कोकिळा आणि भास्कर (बाबू) या भावंडांत बालकवी यांचा क्रमांक तिसरा. त्यांचे वडील पोलीस खात्यात फौजदार होते. त्यांचे नाव बापूराव आईचे नाव गोदूबाई उत्तम गृहिणी आणि अध्यात्मिक प्रवृत्तीच्या होत्या. अतिशय सर्वसाधारण असे हे कुटुंब होते.

बालपणापासूनच त्यांना निसर्गाची प्रचंड ओढ. नदीकिनारी जाऊन शांतपणे निसर्गाची रूपे न्याहाळणे हा त्यांचा छंद. १९०३ साली बालकवी यांचे मराठी शिक्षण संपले. इंग्रजी शिक्षणासाठी ते धुळ्याला गेले, पण तिथे वर्षभरच राहिले. वयाच्या १३ व्या वर्षीच त्यांनी पहिली कविता लिहिली. पुढे ते राष्ट्रीय शाळेत शिक्षण घेऊ लागले. तो काळ देशभक्तीने भारलेला होता

बालकवी यांनी काही सामाजिक कविताही लिहिल्या. वयाच्या १५व्या वर्षी राष्ट्रीय कीर्तनकार श्री रा. कृ. वैद्य यांचा सहवास त्यांना लाभला. १७व्या वर्षी त्यांच्या जीवनात एक अतिशय महत्त्वाची घटना घडली. जळगाव येथे १९०७ साली कविसंमेलन झाले. या संमेलनात बालकवी यांनी ही आपली कविता सादर केली 'अल्पमती मी बालक नेणे काव्याशास्त्रव्युत्पत्ती' ही कवितेची पहिली ओळ. जमलेल्या मोठमोठ्या कवींनी त्यांचे खूपखूप कौतुक केले, शाबासकी दिली. संमेलनाचे अध्यक्ष कर्नल कीर्तिकर आणि रेव्ह. टिळक यांनी त्यांना बालकवी हा किताब दिला

वयाच्या १८व्या वर्षी बालकवी यांचा विवाह झाला. वडील वारल्यानंतर वर्षाच्या आत विवाह करायचा, अशी रुढी असल्याने त्यांनी हा विवाह नाखुशीनेच केला. त्यावेळी त्यांच्या पत्नीचे वय होते सात वर्षे. प्रापंचिक जीवन उपजीविकेचे निश्चित साधन नसल्याने अस्थिर झाले होते. मोठ्या कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली होती. रेव्ह. टिळकांच्या परिचयातून अहमदनगरच्या अमेरिकन मिशन हायस्कूलमध्ये पाचव्या इयत्तेत त्यांनी नाव घातले. १९११च्या अखेरीस ते पुण्याला गेले. 'केसरी' वृत्तपत्रात काहीकाळ नोकरी केली. त्यांची भ्रमंती थांबत नव्हती. ५ मे १९१८ हा त्यांच्या जीवनातील काळा दिवस. आपल्याच तंद्रीत रेल्वे रुळातून चालत असताना त्यांचा अपघाती मृत्यू झाला. जळगावला त्यांच्या मित्राकडे त्यांना जायचे होते. पण मृत्यूने त्यांना ओढून नेले. अवघे २८ वर्षांचे आयुष्य त्यांना लाभले. एवढ्याशा अल्प जीवनात एक श्रेष्ठ कवी म्हणून त्यांनी अवघ्या महाराष्ट्राचे मन जिंकले. बालकवी यांनी काही बालकथाही लिहिल्या. प्राणी–वनस्पती यांच्यावर या बालकथा आधारित आहेत. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा






## आरोग्य प्रहर

### रक्ताच्या कमतरतेवर आहारात करा बदल

जेव्हा शरीरात हिमोग्लोबिनचे उत्पादन कमी होते, तेव्हा लाल रक्तपेशी तयार होत नाहीत. त्यामुळे निमिया होऊ शकतो. म्हणजे सामान्य भाषेत रक्ताची कमतरता. यामुळे त्वचा पिवळी पडते, चेहरा व पाय या सारख्या अवयवांना सूज येते, चक्कर येते. अशक्तपणा जाणवतो, श्वास घेण्यात अडचण येणे, हृदयाचे ठोके अनियमित होतात. अशी वेगवेगळी लक्षणे दिसू लागतात. या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकते. त्यामुळे डॉक्टरांचा सल्ला घ्यावा आणि स्वतः ची तपासणी करून घ्यावी. सोबत काही पदार्थांचा आहारात समावेश करु शकता.



शरीरातील अशक्तपणाचे मुख्य कारण म्हणजे शरीरात लोहाची कमतरता. यामागे अनेक कारणे असू शकतात, जसे की मासिक पाळीत जास्त रक्तस्राव होणे, खाण्याच्या योग्य सवयींचा अभाव . त्यामुळे कोणते पदार्थ खाल्ल्याने शरीरातील हिमोग्लोबिनचे उत्पादन वाढण्यास मदत होते हे जाणून घेऊया.

**ही फळे खाणे फायदेशीर**

ज्यांना निमियाचा त्रास आहे त्यांनी रोजच्या दिनचर्येत सफरचंद आणि डाळिंबाचे सेवन करावे. ही दोन्ही फळे निमियाच्या समस्येवर खूप फायदेशीर मानली जातात आणि इतर पोषक तत्वांची कमतरता देखील पूर्ण करतात.

**मनुका खा**

दररोज मनुका खाणे देखील रक्ताची कमतरता दूर करण्यासाठी फायदेशीर मानले जाते. मनुका लोहाचा चांगला स्रोत आहे. मनुके रात्रभर भिजत ठेवा आणि रोज सकाळी सेवन करा. याशिवाय द्राक्षे खाणेही फायदेशीर आहे.

**हिरव्या पालेभाज्या**

पालक आणि इतर हिरव्या पालेभाज्या देखील लोहाचा उत्कृष्ट स्त्रोत आहेत. त्यामुळे हिमोग्लोबिनची पातळी वाढवण्यास मदत होते. त्यामुळे रोजच्या दिनचर्येत हिरव्या पालेभाज्यांचे सेवन करावे.

**दुग्धजन्य पदार्थांचे सेवन**

दूध आणि त्याची उत्पादने जसे की चीज, दही इ. सर्व दुग्धजन्य पदार्थ हे पौष्टिकतेचे उत्तम स्रोत आहेत जे तुमच्या शरीराला केवळ ताकद देत नाहीत तर हिमोग्लोबिनच्या उत्पादनास प्रोत्साहन देतात. अशक्तपणाची समस्या असल्यास दुग्धजन्य पदार्थ रोज घ्यावेत.

# जिल्हा शासकीय रुग्णालयात दीड वर्षात पाच हजार यशस्वी शस्त्रक्रिया




**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा शासकीय रुग्णालयात गेल्या दीड वर्षात जिल्हा रुग्णालयात ५ हजार २२ शस्त्रक्रिया रुग्णांवर झाल्या आहेत. यामध्ये ३ हजार ९८३ मेजर तर ९९ शस्त्रक्रिया गंभीर स्वरूपाच्या झाल्या आहेत.

जिल्हा शासकीय रुग्णालय आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्याची आरोग्य यंत्रणा सक्षम होऊ लागली आहे. तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीमुळे जिल्हा रुग्णालयात गंभीरातील गंभीर आजारावरील शस्त्रक्रिया यशस्वीपणे होत आहेत. जिल्ह्यातील रुग्णांवर जिल्ह्यातच गंभीर आजारावरील उपचार मिळत आहेत.

जिल्हा शासकीय रुग्णालयात गरीब रुग्ण उपचारासाठी येत असता . पूर्वी जिल्हा रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांची उणीव होती. यामुळे अनेक रुग्णांना गंभीर आजारावर उपचार घेण्यासाठी मुंबईकडे धाव घ्यावी लागत होती. जिल्हा रुग्णालया बरोबरच वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाले. त्यामुळे विविध आजारावरील तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध झाले आहेत. रुग्णावर उपचार करणारी आधुनिक यंत्रणाही कार्यान्वित करण्यात आलेली आहे. त्यामुळे गंभीर आजारांवर यशस्वी शस्त्रक्रिया करणे सोयीचे झाले आहे. त्यामुळे पुढील उपचारासाठी मुंबईला पाठविण्याची प्रक्रिया बंद झाली आहे. त्यामुळे रुग्णाचा वेळ आणि पैशाची बचत होऊन जिल्हा रुग्णालयातच योग्य उपचार मिळू लागले आहेत.

रायगड जिल्हा रुग्णालयात मार्च २०२५ ते ३१ मार्च २०२६ या वर्षात एकूण ३२६४ शस्त्रक्रिया झाल्या होत्या. यापैकी २६३६ मेजर तर ८७ गंभीर आजारावर यशस्वी शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉक्टरांनी केल्या आहेत. एप्रिल ते जुलै २०२६ या कालावधीत एकूण १७५८ विविध आजारावर शस्त्रक्रिया झाल्या. यांपैकी १३४७ मेजर तर २२ गंभीर आजारावर शस्त्रक्रिया करण्यात आल्या होत्या.

लॅपरोटॉमी (पोटाची) शस्त्रक्रिया, स्त्रीरोगविषयक गंभीर प्रसूती, पाठीच्या कण्यावरील शस्त्रक्रिया, ऑर्थोपॅथीविषयक आपत्कालीन शस्त्रक्रिया, क्रॅनियोटॉमी (कवटीची) शस्त्रक्रिया, थायरॉईडच्या आपत्कालीन शस्त्रक्रिया या गंभीर आजारावरील दीड वर्षात ९९ यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामुळे आरोग्य यंत्रणा सक्षम झाली आहे .

## काळंबादेवी मंदिर ते दांडफाटा मार्गावरील धोकादायक दगड, माती हटविण्याचे काम सुरू

**चौक : प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरील ग्रुप ग्रामपंचायत लोधीवली हद्दीतील काळंबा मंदिर ते दांडफाटा दरम्यान धोकादायक माती आणि दगड हटविण्याचे काम आय आर बी या रस्ते देखभाल दुरुस्ती करणाऱ्या कंपनीने सुरू केले असून या मार्गावरून प्रवास करणाऱ्या चालक व प्रवासी यांनी समाधान व्यक्त केले आहे.

जुना मुंबई पुणे रस्त्यावर दोन्ही बाजूला असणाऱ्या काही जमीन मालकांनी आपला भूखंड विकसित करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत, मात्र या हे विकासक मुंबई पुणे रस्त्यावरून आपल्या जागेत रस्ता करत असताना किंवा स्वतःच्या जागेत जाताना होणारी नासधूस याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसते, आपल्या जागेत बांधकाम करताना उर्वरित दगड, वाळू, माती ही तशीच ठेवून देतात.

त्यामुळे रस्त्यावरून जाणारे पाणी याला निचरा होण्यास अडचण होते, त्यामुळे हे पाणी रस्त्यावर येते, किंवा खड्ड्यात साचून राहिल्याने ते पाणी रस्त्यावर येते, मागील महिन्यातील पावसाने येथे मोठे पाणी साचल्याने काही काळ रस्ता बंद पडला होता. वाहतूक कोंडी बरोबर वाहनांना त्रासदायक ठरत असून प्रवासी यांच्या जीवावर बेतत आहे, अपघातांना निमंत्रण दिले जात आहे,

आय आर बी यांच्या लोणावळा येथील कार्यालयाने याची गंभीर दखल घेतली असून वरिष्ठ अधिकारी यांच्या आदेशानुसार आज लोधीवली हद्दीतील काळंबा मंदिर ते दांडफाटा मार्गावरील अडचण दूर करण्यास सुरुवात केल्याची आय आर बी चे अभियंता अनिल धायगुडे यांनी सांगून ग्रुप ग्रामपंचायत चौक सरपंच रितू ठोंबरे यांनी दिलेल्या पत्रा नुसार चौक रेल्वे स्थानक येथे जाणाऱ्या रस्त्यावर संरक्षक खांब उभे करण्यात आले आहेत, ज्यांच्या मुळे या रस्त्याला त्रास होत आहे, अशा जमीन मालकांना व ठेकेदार यांना कायदेशीर नोटीस देण्यात येईल असे आय आर बी अभियंता अनिल धायगुडे यांनी सांगितले.



## ‘पोस्को’च्या सहकार्याने माणगाव तालुक्यातील २३ शाळांच्या भौगोलिक सुविधा अद्ययावत करण्याचा प्रयत्न

**माणगाव : प्रतिनिधी**

"शिक्षणाची गंगा ग्रामीण भागात आणि शेवटच्या घटकापर्यंत पोहोचायची असेल, तर शाळांची इमारत भक्कम आणि वातावरण आनंददायी असायला हवे," याच भावनेतून पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने आपल्या 'सीएसआर' (CSR) निधीतून सुरू केलेल्या व्यापक शाळा दुरुस्ती अभियानाचा यशस्वी टप्पा गाठला आहे. ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा सुधारावा आणि विद्यार्थ्यांना उत्तम सुविधा मिळाव्यात यासाठी पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने CSR अंतर्गत आत्तापर्यंत




माणगाव तालुक्यातील तब्बल २३ शाळांचे नूतनीकरण केले आहे. कंपनीच्या या सामाजिक बांधिलकीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

नुकत्याच झालेल्या जुलै आणि ऑगस्ट महिन्यात मुसळधार पावसात आणि वादळात खचलेल्या, तसेच दुरुस्तीच्या प्रतीक्षेत असलेल्या विविध शाळांच्या नूतनीकृत इमारतींचे लोकार्पण करण्यात आले.

पावसाळ्यात छतातून होणारी गळती, भिंतींचे उखडलेले प्लास्टर आणि नादुरुस्त स्वच्छतागृहे यांमुळे विद्यार्थ्यांना वर्गात बसणेही कठीण झाले होते. या दुरवस्थेचा मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम होत होता.

---

## पनवेल महानगरपालिका, पनवेल

जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.०८/२९२/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १२/०८/२०२६

**पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना**

प्रति,
श्री./श्रीमती...............................
मा.सदस्य/सदस्या,
पनवेल महानगरपालिका, पनवेल.

महोदय/महोदया,

पनवेल महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा क्र.८, गुरुवार दिनांक २०/०८/२०२६ रोजी, सकाळी ११:३० वाजता, महापालिकेच्या "आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल" येथे खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

**सर्वसाधारण सभा क्रमांक ०८, दिनांक २०/०८/२०२६ ची विषयपत्रिका**

**१. मागील सर्वसधारण सभा क्र. ६ दिनांक २२/०७/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे.**
**२. शासकीय पत्रव्यवहार**
**३. प्रश्नोत्तरे**
**४. मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :**
१. दिनांक २२/०७/२०२६ रोजीचा स्थगित विषय पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल -शहरातील अं.भु.क्र.१८४/१ ए पार्ट बहुमजली यांत्रिकी वाहनतळ उभारणे प्रस्तावास व खर्चास मान्यता मिळणेबाबत.
**२. दिनांक २२/०७/२०२६ रोजीचा स्थगित विषय** पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील अमरधाम स्मशानभूमी (अ.भू.क्र.१०६) येथील नादुरुस्त गॅस दाहिनी बदलून नवीन गॅस दाहिनी बसवणे. (दोन युनिट) या कामास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.
३. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती अ, खारघर (प्रभाग क्र.१ ते ६) मधील रस्ते दुरुस्ती करिता वार्षीक दराने काम करणे. (२ वर्षाकरिता, सन २०२६ २७ व २०२७ - २८ करीता)
४. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ब, कळंबोली (प्रभाग क्र.७,८,९,१०,१५ व १६) मधील रस्ते दुरुस्ती करिता वार्षीक दराने काम करणे. (२ वर्षाकरिता, सन २०२६- २७ व २०२७ २८ करीता)
५. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क, कामोठे (प्रभाग क्र. ११,१२,१३ व १४) मधील रस्ते दुरुस्ती करिता वार्षीक दराने काम करणे. (२ वर्षाकरिता, सन २०२६ २७ व २०२७ - २८ करीता)
६. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ड, पनवेल (प्रभाग क्र.१७,१८,१९ व २०) मधील रस्ते दुरुस्ती करिता वार्षीक दराने काम करणे. (२ वर्षाकरिता, सन २०२६ २७ व २०२७ - २८ करीता)
७. पनवेल महानगरपलिका मालकीचे करंजाडे येथील सर्व्हे नं. ११०/ब या जागेवर मच्छी मार्केट उभारणे.
८. पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती अ, खारघर, सेक्टर १३, भुखंड क्र.१३७ येथे सामाजिक सभागृह बांधणे, प्रकल्प राबविणे व संकल्प चित्रास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.
९. पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे तळोजे मजकूर येथील विकास योजनेत दर्शविलेल्या आरक्षण क्र. V- १५० (कोंडवाडा) या भुखंडावर लहान व मोठ्या प्राण्यांकरीता निवारा केंद्र उभारणे.
१०. पनवेल महानगरपालिका मालकीच्या अंतिम भुखंड क्र.१२२ वर पनवेल महानगरपालिकेची मराठी व इंग्रजी माध्यमाची शाळा बांधणे.
११. दुरसंचार नेटवर्क/मोबाईल टॉवरवरील मालमत्ता कर रद्द करणेबाबत.
१२. पनवेल महानगरपालिका हद्दीतील नविन पनवेल येथील सेक्टर ०४, भुखंड क्र. C- २० येथे उद्यान विकसित करणे.
१३. पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली येथील सेक्टर १२, भुखंड क्र.B ०४ येथे उद्यान विकसित करणे.
१४. समाज विकास विभाग अंतर्गत पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वास्तव्य करणाऱ्या युवक -युवतींना **नवी मुंबई - AIR PORT** १८ प्रशिक्षण मोफत देणेबाबत.
१५. दिव्यांग व्यक्तींच्य सर्वांगीण विकासासाठी पनवेल महानगरपालिका हद्दीतील नवीन पनवेल (पू) से-१६, प्लॉट नं.७/बी, येथे शिक्षण, प्रशिक्षण सेवा केंद्र व आरोग्य सेवा केंद्र म्हणेजच (Education Training and Service Centre) दिव्यांग भवन बांधणे.
१६. पनवेल महानगरपालिका आद्य क्रातींवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथील Passenger लिफ्ट बदलून नवीन लिफ्ट स्थापन करणे.
१७. पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती ड क्षेत्रातील नवीन पनवेल (प.) शहरातील HDFC सर्कल ते आदई सर्कल ते अय्यप्पा मंदिर ते अभ्युदय बँक ते HDFC सर्कल या रस्त्यावर डेकोरेटीव पथदीप खांब उभारुन कार्यान्वित करणे या प्रस्तावास, खर्चास व ई निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता मिळणेबाबत

**(मा. महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये)**

**महापालिका भवन, पनवेल**
**दिनांक:- १२/०८/२०२६.**
जा.क्र. पमपा/ जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.२५४/२७७/२०२६

**सही/-**
**नानासाहेब कामठे**
**महापालिका सचिव**
**पनवेल महानगरपालिका**

सोबत - विषयांचे गोषवारे तसेच सर्वसधारण सभा क्र. ६ दिनांक २२/०७/२०२६ रोजीच्या सभेचे इतिवृत्त.

---

## जाहीर नोटीस

आमच्या अशिलांच्या वतीने खालील परिशिष्टात नमूद केलेल्या जमिन मिळकतीबाबत दि. १/७/२०२५ रोजीच्या दैनिक रामप्रहर या वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आलेली होती.

**मौजे- खानाव, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| भुमापन नं. / हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रु. पै. | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| ३२/१ | ०-०४-८० | ०.९४ | 1. सुनील भरत पाटील<br>2. सुमती रमेश पाटील<br>3. सुरेखा भरत पाटील<br>4. संदिप भरत पाटील<br>5. प्रियांका राहूल पाटील<br>6. मानसी देवेंद्र पाटील<br>7. रुद्रा राहूल पाटील<br>8. रेवा राहूल पाटील |

परंतू आमचे अशिल व जमिन मालक यांच्यामध्ये व्यवहाराच्या अटी निश्चित होवू न शकल्याने सदर मिळकतीबाबत व्यवहार करण्यात आलेला नाही. त्यामुळे आमचे अशिल वर नमुद दिनांक १/७/२०२५ रोजीची जाहीर नोटीस सदर नोटीसीव्दारे मागे घेत असल्याचे जाहीर करीत आहेत

पनवेल.
दि.१२/०८/२०२६.

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
कार्यालयः २. आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ 'अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेलता. पनवेल, जि. रायगड
मो. क्र.: ९९३०३६९८६१

---

## पनवेल महानगरपालिका, पनवेल ४१० २०६

**जाहीर नोटीस**

सर्व संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे पिसार्वे, ता. पनवेल येथील सर्व्हे नं. १२ पासून ते मौजे करवले बुद्रुक येथील सर्व्हे नं. ७९ पर्यंतच्या २४.०० मी. रुंदीच्या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) अन्वये दि. ०८/०८/२०२४ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८ (४) अन्वये दि. २५/०६/२०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या विकास योजनानुसार नियोजित रस्त्यामधील मौजे तळोजे मजकूर येथील सर्व्हे नं. ३४/१ मधून प्रस्तावित २४.०० मी. रस्त्याखालील क्षेत्र पनवेल महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टी.डी. आर.) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजाखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पनवेल महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकाशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवस्त्रांच्या आत सहाय्यक संचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका पनवेल ४१० २०६ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मूळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधिताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पनवेल महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टी.डी. आर. च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल, त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) मिळकतीचे वर्णन मौजे तळोजे मजकूर, ता. पनवेल येथील श्री. मधुर बजाज यांचे मालकीच्या जमीन मिळकतीमधील आरक्षणाने बाधित व रस्त्याने बाधित क्षेत्र पुढीलप्रमाणे :-

१) मौजे- तळोजे मजकूर, सर्व्हे नं. ३४/१ रस्त्याने बाधित क्षेत्र ५९०.७० चौ. मी. त्यास नकाशानुसार चतुःसीमा खालीलप्रमाणे
पूर्वेस : ला. हिस्सा. नं. ५
पश्चिमेस : ला.स.नं. ३७
दक्षिणेस : ला.स.नं. ३४/१ उर्वरित क्षेत्र
उत्तरेस : ला.स.नं. ३६

टिप :- उक्त जागा दर्शविणारा नकाशा पाहणीसाठी नगररचना विभागात ठेवण्यात आला आहे.

**सही/-**
**सहाय्यक संचालक नगररचना**
**पनवेल महानगरपालिका,**

दिनांक : १०/०८/२०२६
जा क्र. पमपा/नरवि/टिडीआर/२६-२६/५५२/२०२६

टिप सदरील जाहीर नोटीस पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

---

## पनवेल महानगरपालिका

**दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान**

**"जाहीर आवाहन"**

**पनवेल महानगरपालिकेची तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती स्थापन करणेकरीता सदस्य पदासाठी इच्छुकांचे अर्ज मागविणेबाबत**

पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम-२०१४ चे कलम २० आणि महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ मधील प्रकरण २ नियम क्र. ३, ४ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेमध्ये "तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती" स्थापन करण्याबाबत नमूद केले आहे.

त्यानुसार सदर समितीत एक अध्यक्ष आणि इतर दोन व्यावसायिक अनुभवी सदस्य यांची समिती बनलेली असेल अशी तरतूद आहे. "तक्रार निवारण व विवाद निर्णय" समितीच्या अध्यक्ष व सदस्यांचा कालावधी पाच वर्ष इतका असेल. सदर "तक्रार निवारण व विवाद निर्णय" समितीमध्ये खालील अर्हता व अनुभव असलेल्या व्यक्तींकडून सदस्य या पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पदाचे नाव | पद संख्या | अ. क्र | अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती सदस्य | २ | १ | सदर व्यक्ती पस्तीस वर्षाहून अधिक वयाची असेल परंतु पासष्ट वर्षापेक्षा अधिक वयाची नसेल. |
| | | २ | सदर व्यक्ती मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवी धारण करीत असेल. |
| | | ३ | सदर व्यक्तीला स्थानिक प्राधिकरणांमधील कामाचा अनुभव असेल व शासनाचा अवर सचिव किंवा तत्सम दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये तिने काम केलेले असेल. |
| | | ४ | सदर व्यक्ती कार्यकुशल, सचोटी व प्रतिष्ठा असलेली व्यक्ती असेल आणि सामाजिक कार्यामधील अथवा पथविक्रेत्यांशी किंवा सार्वजनिक कामाशी किंवा नागरी वा सार्वजनिक प्रशासनाशी संबंधित समस्या हाताळण्याचे किमान दहा वर्षांचे पर्याप्त ज्ञान वा अनुभव असलेली असेल, |

तरी, पात्र इच्छुक व्यक्तीनी आपले अर्ज दिनांक २०/०८/२०२६ पर्यंत आवश्यक त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिका आवक-जावक विभागात सादर करावेत. याविषयी अधिक माहितीसाठी पनवेल महानगरपालिका दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाच्या शेजारी शॉपिंग कॉम्प्लेक्स दत्त झेरॉक्स च्या वर दुसरा मजला येथे संपर्क साधावा.

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क/३१२६/
प्र.क्र.२५३/२७६/२०२६
दिनांक : १२/८/२०२६

**सही/-**
**(अभिषेक पराडकर)**
**उपायुक्त पनवेल महानगरपालिका**

---

## पाहिजेत

अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक मुर्तीचे वस्तीगृह, पनवेल. साठी निव्वळ कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरूपात भारती करणेसाठी खालील पदांसाठी अर्ज मागवण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | संख्या | किमान पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | अधीक्षक | १ | कोणत्याही शाखेचा पदवीधर व संगणक ज्ञान | महिला उमेदवार राखीव |
| २ | लिपिक | १ | दहावी पास टंकलेखन व संगणक ज्ञान आवश्यक | महिला उमेदवार राखीव |
| ३ | शिपाई | १ | किमान चौथी पास | महिला उमेदवार राखीव |
| ४ | सफाई कामगार | २ | किमान चौथी पास | महिला उमेदवार राखीव |
| ५ | पहारेकरी | ४ | किमान चौथी पास | महिला उमेदवार राखीव |

सदर पदांकरिता कंत्राटी पद्धतीने मानधन शासन निर्णय / वस्तीगृह -२०१२ /प्र.क्र.-१६८ /का.८ मंत्रालय मुंबई. २१/०६/२०१३ अन्वये राहील. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या (mdd.maharashatra.gov.in) वर उपलब्ध आहे. संपूर्ण अर्ज माहितीसह तसेच साक्षाकित प्रमानपत्रासह स्वीकारण्याचा अंतिम दिनाकः- २२/०८ २०२६ असून मुलाखतीसाठी रविवार दिनांक २३/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता उपस्थित राहावे.

**पत्ता - शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वस्तीगृह, पनवेल.**
**प्राचार्य - शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.**
**NH-४, एस. टी.स्टँड जवळ, पनवेल.**

**सही/-**
**शासकीय अल्पसंख्याक मुलींचे वस्तीगृह,**
**पनवेल, जि. रायगड**

# नवी मुंबईत भाजपची तिरंगा रॅली

## भारत माता की जयच्या घोषणांनी शहर दुमदुमले

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई जिल्हा भारतीय जनता पक्षाच्या वतीने भव्य तिरंगा रॅलीचे आज आयोजन करण्यात आले. ब्ल्यू डायमंड हॉटेल चौकातून सुरू झालेल्या या रॅलीची वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सांगता झाली. 'वंदे मातरम्', 'भारत माता की जय' अशा देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. मोठ्या संख्येने देशप्रेमी नागरिक आणि युवा या रॅलीत सहभागी झाले होते.



माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक, महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, महापालिकेच्या स्थायी समितीचे सभापती अशोक पाटील यांच्यासह भाजपचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी झाले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या 'घरोघरी तिरंगा' फडकविण्याच्या आवाहनाला प्रतिसाद देत भारताचे सार्वभौमत्व, एकता, अखंडता, प्रगती आणि राष्ट्रभावनेप्रती सद्भावना व्यक्त करण्यासाठी या तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. महापौर सुजाता पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या रॅलीला वनमंत्री नामदार गणेश नाईक यांचे मार्गदर्शन लाभले. माजी आमदार संदीप नाईक, भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील आणि उपमहापौर दशरथ भगत यांचे सहकार्य लाभले.

यावेळी बोलताना माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांनी '२०४७ चा विकसित भारत' हा संकल्प पूर्ण करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करण्याचे आवाहन केले. जात, धर्म, पंथ, वर्ण आणि प्रांताच्या पलीकडे जाऊन देशहितासाठी एकत्र येण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. येत्या १५ ऑगस्ट रोजी प्रत्येक नागरिकाने ध्वजारोहण करून आपल्या घरावर तिरंगा फडकवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

"भारतामध्ये युवाशक्ती हीच राष्ट्रशक्ती आहे. या तिरंगा रॅलीमध्ये तरुणांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग पाहायला मिळाला. तरुणाई हीच देशाची खरी ताकद आहे," असे डॉ. संजीव नाईक यांनी सांगितले.

महापौर सुजाता पाटील यांनी आगामी स्वातंत्र्यदिनाच्या नागरिकांना शुभेच्छा दिल्या. "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार आणि नवी मुंबईचे शिल्पकार, वनमंत्री नामदार गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली या तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. तिरंगा म्हणजे केवळ तीन रंग नव्हेत, तर देशाची शक्ती, सामर्थ्य, शांती आणि प्रगतीचे प्रतीक आहे," असे त्यांनी सांगितले.

"तिरंगा हातात घेताना आपण कोणत्याही धर्माचे, जातीचे किंवा पंथाचे नसतो, तर सर्वप्रथम एक भारतीय असतो. देशप्रेमाची भावना प्रत्येकाच्या मनामध्ये रुजविण्यासाठी अशा तिरंगा रॅली आवश्यक आहेत," असेही महापौर सुजाता पाटील यांनी नमूद केले.रॅलीमध्ये भाजपचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, युवा तसेच विविध क्षेत्रांतील देशप्रेमी नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता आणि विकसित भारताचा संदेश देत नवी मुंबईत तिरंग्याच्या सन्मानाचा जागर करण्यात आला.

# सागरी सुरक्षेसाठी कोळी बांधवांनी सज्ज राहणे गरजेचे



**नवी मुंबई : बातमीदार**

समुद्राशी नाळ जोडलेल्या कोळी बांधवांच्या सुरक्षिततेसाठी सागरी सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देणे गरजेचे आहे. मासेमारीसाठी समुद्रात जाणाऱ्या प्रत्येक बोटीमध्ये आवश्यक सुरक्षा यंत्रणा आणि आपत्कालीन साधने उपलब्ध असणे अत्यावश्यक आहे. भारतीय तटरक्षक दलाच्या 'हर घर तिरंगा' कम्युनिटी इंटरॅक्शन कार्यक्रमाच्या माध्यमातून बुधवार ( ता. १२ ) रोजी सागरी सुरक्षा आणि नागरिकांशी संवादाचा संदेश देण्यात आला.

तटरक्षक दलाच्या '७३ एसीव्ही स्क्वॉड्रनच्या वतीने आयोजित या उपक्रमातून तटरक्षक दल आणि स्थानिक समुद्रकिनारी समुदाय यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात आला. समुद्रात मासेमारी करताना अचानक निर्माण होणाऱ्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी कोळी बांधवांनी सतर्क राहणे, तसेच बोटीमध्ये सुरक्षेची पुरेशी साधने ठेवणे आवश्यक असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

मासेमारीसाठी समुद्रात जाणाऱ्या बोटीमध्ये जीवनरक्षक जॅकेट, अग्निशामक यंत्र, प्रथमोपचार पेटी, संपर्कासाठी आवश्यक साधने आणि आपत्कालीन परिस्थितीत उपयोगी पडणारी सुरक्षा उपकरणे उपलब्ध असणे महत्त्वाचे आहे. बोटीची सुरक्षा साधने नियमितपणे तपासणे आणि ती कार्यरत स्थितीत ठेवणेही तितकेच गरजेचे आहे.

सागरी सुरक्षेच्या दृष्टीने तटरक्षक दलासोबत कोळी बांधवांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा मानला जातो. समुद्रात संशयास्पद हालचाल, अडचणीची परिस्थिती किंवा आपत्कालीन घटना निदर्शनास आल्यास तातडीने संबंधित यंत्रणेला माहिती देणे आवश्यक आहे. समुद्रातील सुरक्षेचा कणा असलेल्या कोळी बांधवांना आवश्यक सुरक्षा उपायांची माहिती आणि त्याबाबतचे प्रशिक्षण मिळणे काळाची गरज आहे.

यावेळी 'हर घर तिरंगा'च्या माध्यमातून राष्ट्रभावनेसोबतच सागरी सुरक्षेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला. या कार्यक्रमाला कमांडंट राजीव कुमार, डेप्युटी कमांडंट रोहित यादव, सहाय्यक अभियंता सचिन कुमार, अर्पित कुमार तसेच एन.आर.आय. सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील वाघमारे, सागरी सुरक्षा शाखेचे वपोनि संतोष काणे, वपोनि पवार, पीएसआय मामीलवार यांच्यासह सागरी सुरक्षा दलाचे कर्मचारी ,स्थानिक मच्छिमार उपस्थित होते.

# अ. समद मुकादम यांचा पर्यावरणदूत म्हणून सन्मान

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिकेच्या माझी वसुंधरा अभियानांतर्गत पर्यावरण मित्र, ज्येष्ठ नागरिक अ. समद जाफर मुकादम यांना पालिका कार्यक्षेत्रात पर्यावरण व स्वच्छता उपक्रमात भरीव कामगिरी केल्याबद्दल पर्यावरणदूत म्हणून गौरविण्यात आले.



तक्का परिसरातील मराठी व उर्दू शाळा आणि गोदरेज स्काय गार्डन सोसायटीमधील विद्यार्थी तसेच नागरिकांपर्यंत पर्यावरण संवर्धन आणि संरक्षणाचा संदेश प्रभावीपणे पोहचविण्यासाठी ते अथक प्रयत्न करत आहेत. याबद्दल उपायुक्त स्वरुप खारगे यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

# विकासकाच्या नफ्यासाठी पुनर्विकास नको! सागर नाईक यांची भूमिका

**नवी मुंबई : बातमीदार**

जुन्या इमारतींच्या पुनर्विकासातून रहिवाशांना मोठी आणि सुरक्षित घरे मिळावीत; मात्र त्यासाठी वाढीव एफएसआयच्या अर्बन रिन्यूअल स्कीमचा (यूआरएस) सरसकट वापर करण्याऐवजी स्वयं पुनर्विकासाला सक्षम पर्याय उपलब्ध करून द्यावा, अशी भूमिका सभागृह नेते सागर नाईक यांनी नवी मुंबई महापालिकेच्या महासभेत मांडली.

यूआरएस आणि क्लस्टरला विरोध नसल्याचे स्पष्ट करताना केवळ अतिरिक्त एफएसआय मिळवून विकासकाचा नफा वाढविण्यासाठी, त्याला फायदा मिळवून देण्यासाठी या योजनांचा वापर होऊ नये असा मुद्दा नाईक यांनी मांडला. त्यांच्या या मुद्द्याला भाजपाच्या नगरसेवकांनीदेखील सकारात्मकता दर्शविली. या मुद्द्यावर दोन दिवस झालेल्या चर्चेनंतर सूचना, उपसूचना आणि मर्यादांसह संबंधित प्रस्ताव बहुमताने मंजूर करण्यात आला.

एफएसआय वाढविण्याचा प्रत्येक निर्णय हा केवळ बांधकाम क्षमतेपुरता मर्यादित राहत नाही. वाढीव लोकसंख्येमुळे पाणी, रस्ते, सांडपाणी, वाहतूक, अग्निसुरक्षा, शिक्षण, आरोग्य आणि अन्य नागरी सुविधांवर ताण येतो. त्यामुळे एफएसआयचे दरवाजे सरसकट खुले न करता कुठे, किती आणि कशासाठी अतिरिक्त एफएसआय द्यायचा, याचे निकष निश्चित करणे आवश्यक असल्याचे नाईक यांनी सांगितले.

ज्या भागात सामान्य पुनर्विकास शक्य आहे, तेथे यूआरएसची गरज नाही. सामान्य पुनर्विकासातूनही रहिवाशांना मोठी घरे मिळू शकतात. त्याऐवजी दाटीवाटीचे, नियोजनाच्या दृष्टीने अडचणीचे किंवा पारंपरिक पुनर्विकास शक्य नसलेले भाग यूआरएससाठी प्राधान्याने निवडावेत. यूआरएसच्या माध्यमातून रस्त्यांचे जाळे, मोकळ्या जागा, अग्निशमन प्रवेश आणि पाणी–सांडपाणी व्यवस्था सुधारून परिसराचे एकत्रित नगरनियोजन झाले पाहिजे. केवळ इमारतींचे बांधकाम वाढविणे म्हणजे शहरी पुनर्निर्माण नव्हे, असे त्यांनी स्पष्ट केले.

स्वयं पुनर्विकासासाठी महापालिकेने तांत्रिक मार्गदर्शन, प्रकल्प व्यवस्थापन, वित्तपुरवठा समन्वय आणि एक खिडकी परवानगी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी. दोन–तीन सोसायट्या एकत्र येऊन परिसराचा विकास करीत असतील, तर आवश्यक तेवढा प्रोत्साहनात्मक एफएसआय देऊन 'नोडल रिप्लॅनिंग' साध्य करता येईल, असा पर्यायही नाईक यांनी मांडला.

यूआरएसचा अंतिम उद्देश रहिवाशांना मोठी घरे देण्याबरोबरच शहराची नगररचना सुधारणे हा असावा. शासनाने सध्याच्या धोरणाचा फेरविचार करून आवश्यक सुधारणा कराव्यात आणि शहराच्या पायाभूत क्षमतेचा वैज्ञानिक अभ्यास करावा, या मागणीसह प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

# एमएनएम विद्यालयात पारंपरिक दीपपूजन सोहळा उत्साहात

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एम.एन.एम. विद्यालय व टी.एन.जी. कनिष्ठ विज्ञान विद्यालयात पारंपरिक दीपपूजन सोहळ्याचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, परंपरा, सर्जनशीलता आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोन रुजविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.




या उपक्रमांतर्गत इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी दीपपूजन, इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी दिया सजावट, तर इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी 'Best out of Waste Lantern Making' या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी विविध रंग व सजावटीच्या साहित्याचा वापर करून आकर्षक पणत्या सजवल्या. पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंपासून सुंदर व कल्पक कंदील तयार करून आपल्या सर्जनशीलतेचे दर्शन घडविले.

या संपूर्ण उपक्रमाचे उत्तम नियोजन विद्यालयाच्या प्राचार्या तसेच सर्व वर्गशिक्षकांनी केले होते. त्यांच्या मार्गदर्शनामुळे सर्व उपक्रम शिस्तबद्ध, उत्साहपूर्ण आणि यशस्वीरीत्या पार पडले.विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे पारंपरिक दीपपूजन सोहळ्याला विशेष रंगत आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, दीपाचे महत्त्व, ज्ञानाचा प्रकाश आणि सर्जनशीलतेचा सुंदर संदेश मिळाला.

# पिरकोन पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूलचे शिष्यवृत्तीत घवघवीत यश

**उरण : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या पंचरत्न इंग्लिश मीडियम स्कूल, पिरकोनच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शैक्षणिक यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. इयत्ता ४ थीमधील कु. अवनी विकास गावंड हिने १९४ गुण, इयत्ता ५ वीमधील कु. आर्य निलेश म्हात्रे याने १७४ गुण, तर इयत्ता ७ वीमधील कु. विधेश सदाशिव जोशी याने २३४ गुण मिळवून शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले.

या तिघांनीही रायगड जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवण्याचा बहुमान मिळवला आहे.विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्था रायगड विभाग समन्वय समितीचे सदस्य आणि रा. जि. प. सदस्य जीवन गावंड, स्थानिक सल्लागार समितीचे चेअरमन रमाकांत गावंड, व्हाईस चेअरमन अनंत गावंड, स्कूल कमिटीचे सदस्य अनंत गावंड, रमाकांत जोशी, विलास गावंड, मुकुंद गावंड, राजेंद्र गावंड, सुरेंद्र गावंड, लक्ष्मण गावंड, हिराचंद पाटील, चंद्रकांत पाटील, प्रा. प्रमोद म्हात्रे, मनोहर गावंड, मंगेश गावंड, नरेंद्र गावंड, विलास गावंड, शाळेच्या मुख्याध्यापिका निकिता गायकवाड, शिक्षकवृंद आणि पालकांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

# गव्हाण विद्यालयात स्थानिक स्कूल कमिटीची सहविचार सभा

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज,गव्हाण–कोपर येथे मंगळवार, दिनांक ११ ऑगस्ट २०२६ रोजी स्थानिक स्कूल कमिटीची सहविचार सभाउत्साहपूर्ण व सकारात्मक वातावरणात संपन्न झाली.



रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन श्री. चंद्रकांत दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या प्रत्येक शाखेने शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखडा तयारकरण्याच्या अनुषंगाने गव्हाण विद्यालयाने आपला शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखडा तयार केला आहे.या आराखड्यात निश्चित करण्यात आलेली ध्येयधोरणे प्रत्यक्षात प्रभावीपणे राबविणे, त्यासाठी स्कूलकमिटीच्या सर्व सदस्यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळविणे तसेच विद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीबाबत सर्वसदस्यांमध्ये एकमत निर्माण करणे, या उद्देशाने सदर सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले होते.

या सभेस विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडीसदस्य अरुणशेठ भगत, ज्युनिअर कॉलेज कमिटीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर साहेब,विश्वनाथ कोळी, कॉलेज कमिटीचे सदस्य विजयशेठ घरत व ॲड. श्री. राहुल घरत, विद्यालयाच्या प्राचार्या व रयत शिक्षण संस्थेच्या समन्वय समिती सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, माध्यमिक विभागातून रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व ज्येष्ठ शिक्षक रविंद्र भोईर, लेखनिक महेश म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज समिती सदस्य माणिक घरत, वरिष्ठ लेखनिक. निलेश गोडे,आदी मान्यवर उपस्थित होते. सदर आराखड्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी रायगडविभागाचे पी.आर.ओ. कारंडे देखील उपस्थित होते.

सभेमध्ये विद्यालयाने तयार केलेल्या रयत शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखड्यातील विविधमुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. इमारत बांधकाम विकास, पायाभूत सुविधा विकास, भौतिकसुविधा विकास, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे, विविधशैक्षणिक व सहशालेय उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करणे, विद्यार्थ्यांना आवश्यक त्या शैक्षणिकसुविधा उपलब्ध करून देणे तसेच विद्यालयाच्या प्रगतीसाठी विविध स्तरांवर नियोजनबद्ध प्रयत्न करणे,

या अनुषंगाने उपस्थित सदस्यांनी आपली मते व सूचना मांडल्या.सर्व सदस्यांच्या चर्चेनंतर विद्यालयाचाशैक्षणिक गुणवत्ता विकास आराखडा सर्वानुमते मंजूर करण्यात आला. तसेच मंजूर आराखड्याची संस्थेच्यास्तरावर आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करून तो संस्थेच्या प्रणालीवर अपलोड करण्याचेही निश्चित करण्यातआले. आराखड्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थानिक स्कूल कमिटीच्या सर्व सदस्यांनी विद्यालयालाआवश्यक ते मार्गदर्शन व सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

"गुणवत्तापूर्ण शिक्षण, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि विद्यालयाची सातत्यपूर्ण प्रगती" हेउद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून तयार करण्यात आलेला हा गुणवत्ता विकास आराखडा विद्यालयाच्या आगामीशैक्षणिक वाटचालीस निश्चितच दिशादर्शक ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.सभेच्याशेवटी विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे व स्कूल कमिटीसदस्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# गटारी अमावास्येला खवय्यांचा मांसाहारावर ताव

**नवी मुंबई : बातमीदार**

आषाढ अमावास्येनिमित्त साजऱ्या होणाऱ्या 'गटारी'चा उत्साह नवी मुंबईत पाहायला मिळत आहे. पवित्र श्रावण मास सुरू होण्यापूर्वी मांसाहाराचा मनसोक्त आस्वाद घेण्यासाठी नागरिकांनी बुधवारी सकाळ पासूनच मटण, चिकन आणि मासळीच्या बाजारपेठांकडे मोठी गर्दी केली. दिवाळे कोळीवाड्यासह शहरातील विविध बाजारपेठांमध्ये खवय्यांच्या लांबच लांब रांगा लागल्याने बाजारपेठांना जत्रेचे स्वरूप आले आहे.



या गटारी अमावास्येच्या पार्श्वभूमीवर पहाटेपासूनच मांसाहार विक्री केंद्रांवर ग्राहकांची वर्दळ सुरू झाली. गावठी कोंबडी, मटण तसेच ताज्या आणि दर्जेदार मासळीला ग्राहकांकडून विशेष पसंती मिळत आहे. आपल्या आवडीची मासळी आणि मांस मिळावे यासाठी अनेक ग्राहकांनी सकाळी लवकरच बाजार गाठला.

गटारीच्या निमित्ताने मांसाहाराची मागणी मोठ्या प्रमाणात वाढल्याने चिकन आणि मटणाच्या दरात काहीशी वाढ झाली आहे. मात्र, दरवाढीचा फारसा परिणाम ग्राहकांच्या उत्साहावर झालेला दिसून आला नाही. कुटुंबासाठी पुरेशा प्रमाणात मांसाहारी पदार्थांची खरेदी करण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली आहे.

उद्यापासून पवित्र श्रावण महिन्याला सुरुवात होत असल्याने अनेक नागरिक आजचा दिवस मांसाहारी जेवणाचा शेवटचा बेत म्हणून साजरा करत आहेत. त्यामुळे घराघरांत गटारीच्या विशेष मेजवानीची तयारी सुरू असून बाजारपेठांमध्ये सकाळपासूनच खरेदीचा उत्साह दिसून येत आहे.

दरम्यान, दिवाळे कोळीवाड्यात मासळी खरेदीसाठी झालेली गर्दी विशेष लक्षवेधी ठरली. विविध प्रकारच्या मासळीची मोठ्या प्रमाणावर खरेदी होत असल्याने विक्रेत्यांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे. गटारीच्या निमित्ताने नवी मुंबईतील बाजारपेठा आज खवय्यांच्या गर्दीने फुलून गेल्या असून, श्रावणाच्या स्वागतापूर्वी नागरिकांनी मांसाहारी पदार्थांवर मनसोक्त ताव मारला...!

# आदिवासींच्या प्रश्नांवर मंत्री उईकेंशी चर्चा

## पेण, सुधागडच्या समाजासाठी सभागृह उभारणार -वैकुंठ पाटील





**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील आदिवासी बांधवांच्या विविध प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी राज्याचे आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांनी विशेष बैठक घेतली. या बैठकीत पेण आणि सुधागड तालुक्यातील आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले.

आदिवासी समाजासाठी पेण आणि सुधागड येथे स्वतंत्र भव्य सभागृह उभारण्याची मागणी यावेळी करण्यात आली असून या मागणीला मंत्री उईके यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याची माहिती जिल्हा परिषदेचे सभापती वैकुंठ पाटील यांनी पाली येथे दिली.

मुंबई येथील लोहगड बंगल्यावर आदिवासी विकासमंत्री डॉ. उईके यांची सदिच्छा भेट घेत रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते सतीश धारप, जिल्हा परिषद सभापती वैकुंठ पाटील, आस्वाद पाटील, प्रकाश देसाई, जि.प.सदस्य चंद्रकांत वारगुडा, गोविंद लेंडी, जनार्दन भस्मा, सोपान जांभेकर, प्रशांत शिंदे यांनी पेण व सुधागड तालुक्यातील आदिवासी बांधवांच्या प्रमुख समस्या मंत्र्यांसमोर मांडल्या.

पेण तालुक्यात मोठ्या संख्येने आदिवासी समाजाची लोकसंख्या असून सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांसाठी आदिवासी समाजाकडे स्वतःचे सभागृह उपलब्ध नाही. त्यामुळे समाजाच्या बैठका, विविध कार्यक्रम, मार्गदर्शन शिबिरे तसेच सामाजिक उपक्रम आयोजित करताना अनेक अडचणी निर्माण होतात. ही बाब लक्षात घेता पेण तालुक्यात आदिवासी समाजासाठी स्वतंत्र सभागृह उभारण्यात यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. त्याचबरोबर सुधागड तालुक्यातही आदिवासी समाजासाठी सभागृहाची आवश्यकता असल्याचे मंत्री उईके यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. या मागणीबाबत मंत्री उईके यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी योजनांचा प्रत्यक्ष लाभ वाडी-वस्त्यांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. आदिवासी बांधवांना रस्ते, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण यांसह आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येतील, असे सभापती वैकुंठ पाटील यांनी सांगितले.

रोजगाराच्या मर्यादित संधींमुळे आदिवासी कुटुंबांना अनेकदा रोजगारासाठी स्थलांतर करावे लागते. त्यामुळे त्यांच्या मुलांच्या शिक्षणावरही परिणाम होतो. आदिवासी बांधवांना त्यांच्या गाव परिसरातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन स्थलांतराचे प्रमाण कमी करणे आणि शिक्षणाचे प्रमाण वाढविणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट असल्याचेही पाटील यांनी स्पष्ट केले.

आदिवासी बांधवांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या मूलभूत प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आपण कायम प्रयत्नशील राहू. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहचविण्यासाठी भाजप कटिबद्ध असून आदिवासी समाजाच्या विकासासाठी आवश्यक त्या सर्व बाबींचा सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## मुरूडमध्ये मसाल्यांच्या रोपांचे वाटप आणि लागवड



**मुरुड : प्रतिनिधी**

लायन्स क्लब ऑफ मुरुड जंजिरा आणि अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली विविध मसाल्यांच्या ५० रोपांचे वाटप व लागवड उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करून करण्यात आला.

या कार्यक्रमास लायन्स क्लब ऑफ मुरुड जंजिराचे अध्यक्ष व लायन्स पर्यावरण विभाग रायगड जिल्हा समन्वयक सनी सोगावकर, लायन्स क्लब मुरुडचे खजिनदार मकरंद कर्णिक, नरेश कुबल, नयन कर्णिक व नैनिता कर्णिक तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते. त्याचप्रमाणे अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेजच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य तौसिफ फत्ते यांच्यासह इतरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे डॉ. फिरोज शेख तसेच आजीवन शिक्षण विभागप्रमुख रहीम बागवान यांनी परिश्रम घेतले.या उपक्रमाच्या आयोजनासाठी फाईज खानजादा, अरबाज दरोगे, रायन रोख, युसुफ भालदार, हुजेफा कादरी आणि हवालदार झकेरिया या विद्यार्थ्यांनीही योगदान दिले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन, वृक्षलागवड तसेच औषधी व मसाल्यांच्या वनस्पतींचे महत्त्व आणि त्यांच्या संगोपनाबाबत जागरूकता निर्माण झाली. विद्यार्थ्यांनी या रोपांची योग्य निगा राखून पर्यावरण संवर्धनात सक्रिय सहभाग घ्यावा, असा संदेश यातून देण्यात आला.

## १० वर्षे सेवा केलेल्या गटप्रवर्तकांना शासकीय समायोजन करून घ्या; संघटनेची मागणी



**कर्जत : प्रतिनिधी**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यात कार्यरत असलेल्या गटप्रवर्तकांना शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी जोर धरू लागली आहे. या पार्श्वभूमीवर कर्जत तालुक्यातील गटप्रवर्तकांनी आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेतली आणि शासन दरबारी आवाज उठवण्याची मागणी केली. यावेळी आमदार थोरवे यांनी गटप्रवर्तकांचे प्रश्न समजून घेत आपण शासनाकडे पाठपुरावा करू, असे आश्वासन दिले.


महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय आरोग्य मिशन गटप्रवर्तक संघटनेच्या वतीने आरोग्यमंत्री, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव तसेच आरोग्य आयुक्त यांना याबत निवेदन देण्यात आले आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यात सुमारे तीन हजारांपेक्षा अधिक गटप्रवर्तक कार्यरत असून हे गटप्रवर्तक ग्रामीण तसेच शहरी भागात आरोग्यविषयक जनजागृती आणि विविध आरोग्य अभियानांच्या प्रभावी अंमलबजावणीत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

गटप्रवर्तकांना दर महिन्याला केवळ २५ दिवसांचे काम देऊन त्यांनी केलेल्या कामाचा अहवाल सादर करण्याची पद्धत आहे. गटप्रवर्तक आशा वर्कर यांच्या कामावर देखरेख ठेवण्याबरोबरच त्यांना मार्गदर्शन करतात. शासन, प्रशासन आणि आशा वर्कर यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून गटप्रवर्तक काम करत असल्याचे संघटनेने निवेदनात म्हटले आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार सुरुवातीच्या काळात गटप्रवर्तकांकडून अकरा महिन्याच्या बॉण्ड पेपरवर करार करून घेतला जात होता. त्यानंतर दर ११ महिन्यांनी त्यांच्या आदेशाचे नूतनीकरण केले जात होते. त्यामुळे गटप्रवर्तक हे कंत्राटी कर्मचारी असल्याचे स्पष्ट होते. ३० जून २०२६ रोजी महाराष्ट्र शासनाने राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी १० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करून त्यांचे सेवा समायोजन करण्याबत शासन निर्णय निर्गमित केला आहे.

या निर्णयाचा लाभ गटप्रवर्तकांनाही देण्यात यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून आमदार महेंद्र थोरवे यांना निवेदन देण्यात आले. आमदार थोरवे यांनी गटप्रवर्तकांना नागरिकांना सेवा देण्यासाठी त्यांच्या उपयोगी १२ लॅपटॉप देण्याचे आश्वासन दिले.

यावेळी गटप्रवर्तक अनिता शेलार, शशिकला मसणे, नूतन देशमुख, सुजाता वेहळे, रुपाली राणे, वेदीका खाडे, साधना जाधव, मालती कोयते आदी उपस्थित होते.

## शिष्यवृत्ती परीक्षेत मोक्ष भांगरे रायगडात पाचवा



**नागोठणे : बातमीदार**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या नागोठणे येथील कै. अमरचंद जेठमल जैन प्राथमिक शाळेतील विद्यार्थी मोक्ष कमल भरत भांगरे याने सन २०२६मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत रायगड जिल्ह्यात पाचवा क्रमांक पटकावत घवघवीत यश संपादन केले आहे. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल नागोठणे परिसरातून त्याचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

मोक्ष भांगरे याने आपल्या अभ्यासातील सातत्य, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले असून त्याच्या या यशामुळे कै. अमरचंद जेठमल जैन प्राथमिक शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

मोक्षला हे यश मिळवून देण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका अनघा लोखंडे, वर्गशिक्षक राहुल भवर, शिक्षिका राजश्री जाधव व विजया पिंगळे यांनी विशेष मार्गदर्शन केले. मोक्षच्या या यशाबद्दल शाळा समितीचे अध्यक्ष अनिल काळे, सदस्य जयराम पवार व सुभाष जैन यांनी त्याचे व त्याला मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. मोक्षच्या या उज्ज्वल यशामुळे नागोठणे परिसराच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भर पडली असून त्याच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



**रोहा : येथील डॉ. चिंतामणराव देशमुख सभागृहात अभिनेता विनय येडेकर व संतोष पवार यांची जुगलबंदी असलेले 'ए भाऊ डोकं नको खाऊ' हे नाटक सादर झाले. यावेळी मंत्री आदिती तटकरे यांनी स्वागत केले, तर यानिमित्ताने काढण्यात आलेल्या लकी ड्रॉचे पारितोषिक पैठणी देताना सभापती विजया पाशिलकर, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, भाजप महिला आघाडीच्या श्रद्धा घाग आदी.**



## मोहोपाडा येथील वाईन शॉपचे शटर तोडून चोरी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील डिंपल वाईन शॉपमध्ये अज्ञात चोरट्यांनी दुकानाचे शटर तोडून चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. चोरट्यांनी दुकानातील ड्रॉवरचे लॉक तोडून ४५ हजार रुपयांची रोख रक्कम आणि १० हजार रुपये किमतीचा मोबाईल फोन असा एकूण ५५ हजार रुपये किमतीचा ऐवज लंपास केला. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस चोरट्यांचा शोध घेत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार डिंपल वाईन शॉप हे रात्री नेहमीप्रमाणे बंद करण्यात आले होते. रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी दुकानाच्या शटरचे कुलूप कशाच्या तरी सहाय्याने तोडले आणि आत प्रवेश केल्यानंतर थेट काउंटर गाठले. तिथल्या ड्रॉवरचे लॉक तोडून आत ठेवलेली ४५ हजार रुपयांची रोकड तसेच १० हजार रुपये किमतीचा मोबाईल फोनही चोरट्यांनी पळवून नेला. पोलिसांकडून या चोरट्यांचा शोध सुरू आहे.

## रोहा येथे संत नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळ्यनिमित्ताने विविध उपक्रम



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नामदेव शिंपी समाजातर्फे गणपती मंदिरात संत नामदेव महाराज यांची ६७६वी संजीवन समाधी सोहळा विविध स्तुत्य कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली.

समाजाचे अध्यक्ष मकरंद बारटके व महिल अध्यक्ष शर्वरी वर्णे यांच्या मार्गदर्शनाखाली कमिटी पदाधिकारी सहकार्यातून कार्यक्रम झाला. सकाळी रवींद्र पतंगे यांच्या पौरोहित्याखाली समाजाचे उपाध्यक्ष किरण बारटके यांच्या हस्ते संत नामदेव महाराज व अन्य देवतांची पूजा, अभिषेक आरती असे धार्मिक विधी झाले. सायंकाळच्या कार्यक्रमात अध्यक्ष यांनी नामदेव महाराज यांचे विचार त्यांचे कार्य याबद्दल माहिती सांगितली. संत नामदेव महाराजांचा शासन दरबारी महापुरुष म्हणून उल्लेख होऊन त्यांच्या जयंती अथवा संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त शासकीय सुट्टी द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

समाजात वागताना समता, सदभावना, सहकार्य, विश्वास, प्रामाणिकपणा; त्याचप्रमाणे मेहनत, कष्ट घेणे, सकारात्मक विचार करणे हे थोर पुरुषांचे विचार आताच्या तरुण पिढीने विज्ञान आणि संगणक युग असले तरी आचरणात आणावे, असे डॉ. चंद्रमोहन भांबुरे यांनी सांगितले.

डॉ. पल्लवी बारटके यांनी आम्ही दुबई, शारजा, अबुधाबी अशा सात-आठ देशात महाराष्ट्रातील हिंदू बांधव-भगिनी एकत्र जमतो, आपले सर्व सण, संस्कृती जपतो, असे सांगितले. संत नामदेव महाराजांनी महाराष्ट्रात नव्हे तर देशभर भागवत धर्माचा पताका फडकावून प्रचार, प्रसार केला. पंजाबात त्यांच्या श्लोकांचे अध्ययन व वाचन केले जाते. त्यांच्या वंशात आपला जन्म झाला, आपण खरोखरच भाग्यवान आहोत. आपला समाज जरी जिकडे तिकडे पसरला असला तरी निरनिराळ्या कार्यक्रमाच्या निमित्ताने एकत्र येणे आवश्यक आहे. समाजात आपली मुले हुशार आहेत. त्यांना प्रोत्साहान व प्रेरणा देणे अत्यंत आवश्यक आहे, असे सांगून बहीण डॉ. प्राजता भांबुरे ही दापोलीसारख्या छोट्या ठिकाणी राहिली. ती आज अमेरिका येथे लष्करात मोठ्या पदावर काम करते, हे अभिमानास्पद आहे. सर्वांनी कष्ट, आत्मविश्वासाने शैक्षणिक व अन्य क्षेत्रात नावलौकिक मिळवावा, असे आवाहन केले.

गौरी बारटक्के या रोहा नगर परिषदेच्या निवडणुकीत नगरसेविका म्हणून निवडून आल्या तसेच पावनी प्रसाद बारटक्के हिने दहावीच्या परीक्षेत ९८.५० टक्के गुण मिळाल्याचे सांगितले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते ७० टक्के व त्यापेक्षा अधिक मार्क्स मिळालेल्याचे कौतुक करून त्यांना भेटवस्तू प्रदान करण्यात आल्या. वयाची ७५ वर्षे पूर्ण झाली त्यांचा शाल, श्रीफळ प्रदान करून सत्कार करण्यात आला.

## खोपोलीत पाळीव मांजराचा अनोखा उत्सव

■ आंतरराष्ट्रीय मांजर दिनानिमित्त २००हून अधिक मांजरप्रेमींची उपस्थिती

**खोपोली : प्रतिनिधी**

कुशीत अलगद येऊन विसावणारे, पावलांची चाहूल लागताच शेपटी उंचावून स्वागत करणारे आणि न बोलताही माया लावणारे मांजरांचे हे विश्वच काही और! याच निरागस सहवासाचा आणि प्राणीप्रेमाचा उत्सव खोपोलीत अनुभवायला मिळाला.

आंतरराष्ट्रीय मांजर दिनाचे औचित्य साधून ८ ऑगस्ट रोजी श्री कृपा एक्वेरियम व पेट केअर सेंटर येथे हेल्प फाउंडेशनच्या सहकार्याने विशेष आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला शहर व परिसरातील २००हून अधिक मांजरप्रेमींनी आपल्या लाडक्या मांजरांसह उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमादरम्यान मांजरांच्या संगोपनासंदर्भात विविध उपयुक्त माहिती देण्यात आली. योग्य आहार, आरोग्य, स्वच्छता आणि सुदृढतेसाठी आवश्यक काळजी याबाबत पशुवैद्यकीय मार्गदर्शन मिळाल्याने उपस्थितांसाठी हा उपक्रम माहितीपूर्ण ठरला.

या वेळी डॉ. विष्णू काळे आणि डॉ. सरदार यांनी उपस्थिती लावत मांजरांच्या आरोग्याशी संबंधित विषयांवर मार्गदर्शन केले. आपल्या पाळीव प्राण्यांच्या आरोग्याबाबत असलेल्या प्रश्नांची उत्तरे जाणून घेण्यासाठी अनेकांनी तज्ज्ञांशी संवाद साधला. मांजरप्रेमींसाठी आणखी एक आकर्षण ठरले ते विविध कंपन्यांच्या उत्पादनांचे वितरण. ड्रूल्स फूड, सिग्नेचर, झूमिस पेट्स परपोरेटो, अवंती फूड, ऑरेंज पेट फूड, जेनेक्स, सावा वेट इत्यादी कंपन्यांच्या माध्यमातून फूड सॅम्पल्स, सप्लिमेंट्स, पशुखाद्य, औषधे, शाम्पू तसेच विविध भेटवस्तू उपलब्ध करून देण्यात आल्या.

आपल्या लाडक्या मांजरांसोबत वेळ घालवताना अनेकांनी आपल्या अनुभवांची देवाणघेवाण केली. प्राण्यांवरील प्रेम, जबाबदार संगोपन आणि माणूस आणि पाळीव प्राणी यांच्यातील भावनिक नाते यांचा सुंदर संगम या निमित्ताने पाहायला मिळाला. त्यामुळे हा केवळ एक कार्यक्रम न राहता अधावपळीच्या जीवनात मांजरासारखे पाळीव प्राणीदेखील कुटुंबाचा भाग आहेत हा जिव्हाळ्याचा संदेश देणारा अनुभव ठरला.





# टीम इंडियाला दुखापतींचे ग्रहण

## बुमराह, सुदर्शननंतर वॉशिंग्टन सुंदर संघाबाहेर होणार?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघ सध्या श्रीलंका दौऱ्यावर आहे. येत्या १५ ऑगस्टपासून दोन्ही संघांमध्ये दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेला सुरुवात होणार आहे. त्याआधीच भारतीय संघाला दोन मोठे धक्के बसले आहेत. अनुभवी गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि स्टार फलंदाज साई सुदर्शन दुखापतीमुळे कसोटी मालिकेतून बाहेर झाले आहेत. आता अष्टपैलू खेळाडू वॉशिंग्टन सुंदरदेखील संघाबाहेर होऊ शकतो.



इंग्लंड दौऱ्यावर असताना वॉशिंग्टन सुंदरच्या उजव्या पायाला दुखापत झाली होती. तो अजूनही या दुखापतीतून सावरू शकलेला नाही. त्यामुळे श्रीलंका दौऱ्यासाठी त्याला भारतीय संघात स्थान तर दिले गेले, पण तो खेळणार की नाही, हे त्याच्या फिटनेसवर अवलंबून आहे. तो पहिल्या सामन्यात खेळणार नसल्याचे आधीच स्पष्ट करण्यात आले होते. आता तो मालिकेतील दुसऱ्या सामन्यातूनही बाहेर होऊ शकतो.

भारत आणि श्रीलंका या दोन्ही संघांमध्ये होणाऱ्या कसोटी मालिकेतील पहिला सामना १५ ते १९ ऑगस्टदरम्यान गॉलच्या मैदानावर खेळवला जाणार आहे. सुत्रांच्या माहितीनुसार सध्या तरी वॉशिंग्टन सुंदर श्रीलंका दौऱ्यावर जाण्याची शक्यता खूप कमी आहे. टीम मॅनेजमेंटला त्यानुसार प्लॅनिंग करावी, असे सांगण्यात आले आहे.

**...तर तो १६वा सदस्य असेल!**

बुमराह बाहेर झाल्यानंतर त्याच्या जागी आकिब नबीला संधी दिली गेली होती, तर साई सुदर्शन बाहेर झाल्यानंतर त्याच्या जागी सर्फराज खानचा संघात समावेश करण्यात आला आहे, पण वॉशिंग्टन सुंदर संघाबाहेर झाल्यास, त्याच्या जागी कुठल्याही खेळाडूला संधी दिली जाणार नाही, कारण बीसीसीआयने आधीच १५ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. जर वॉशिंग्टन सुंदर संघासोबत जोडला गेला, तर तो १६वा सदस्य असेल.

# मिचेल मार्शने द हंड्रेड लीगमध्ये गाठला चारशे धावांचा टप्पा

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या द हंड्रेड लीगमध्ये ऑस्ट्रेलियाच्या टी-२० संघाचा कर्णधार मिचेल मार्शची बॅट चांगलीच तळपली आहे. या स्पर्धेत सनरायझर्स लीड्स संघाकडून खेळताना त्याने धावांचा पाऊस पाडला आहे. आता आणखी एक दमदार खेळी करून त्याने मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.

मँचेस्टर सुपर जायंट्सविरुद्धच्या सामन्यात फलंदाजी करताना मिचेल मार्शने २३ चेंडूंचा सामना करत ३२ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर त्याने यंदाच्या द हंड्रेड लीगमध्ये ४०० धावांचा पल्ला गाठला आहे. यासह तो या स्पर्धेतील एकाच हंगामात ४००हून अधिक धावा करणारा दुसराच फलंदाज ठरला आहे.

याआधी इंग्लंडच्या जेम्स विंसने २०२४मध्ये साऊदर्न ब्रेव संघासाठी खेळताना १० सामन्यांमध्ये ४२४ धावा केल्या होत्या. आता मिचेल मार्शकडे हा रेकॉर्ड मोडून काढण्याची संधी असणार आहे. यासह त्याच्या नावे आणखी एका मोठ्या रेकॉर्डची नोंद झाली आहे. मार्श हा द हंड्रेड स्पर्धेतील एकाच हंगामात ४०० धावांचा पल्ला गाठणारा पहिलाच परदेशी फलंदाज ठरला आहे.

**षटकारांच्या विक्रमाशी साधली बरोबरी**

मिचेल मार्शने या हंगामात फलंदाजी करताना षटकारांचा पाऊस पाडला आहे. यादरम्यान त्याने षटकारांचा मोठा रेकॉर्डदेखील आपल्या नावावर केला आहे. मिचेल मार्श टी-२० क्रिकेटमध्ये एकाच वर्षी सर्वाधिक षटकार मारणाऱ्या फलंदाजांच्या यादीत अव्वल स्थानी पोहचला आहे. मार्शने यंदा आतापर्यंत ९४ षटकार खेचले आहेत. या रेकॉर्डमध्ये त्याने टिम डेव्हिडची बरोबरी केली आहे. डेव्हिडने २०२५मध्ये ९४ षटकार खेचले होते.

# रोनाल्डो-जॉर्जिना अखेर विवाहबद्ध

**कॅस्केइस : वृत्तसंस्था**

फुटबॉलविश्वातील दिग्गज स्टार क्रिस्टियानो रोनाल्डोने अखेर त्याची दीर्घकाळची साथीदार जॉर्जिना रॉड्रिग्ज हिच्यासोबत लग्न केले आहे. तब्बल दहा वर्षांच्या प्रेमसंबंधानंतर दोघांनी विवाहबंधनात अडकण्याचा निर्णय घेतला.



मिळालेल्या माहितीनुसार ११ ऑगस्ट रोजी पोर्तुगालमधील कॅस्केइस येथे अत्यंत खासगी आणि साध्या नागरी सोहळ्यात रोनाल्डो आणि जॉर्जिनाने लग्न केले. या विवाहसोहळ्यापासून दूर राहून दोघांनी हा खास क्षण आपल्या कुटुंबीय आणि जवळच्या व्यक्तींसोबत साजरा केल्याचे वृत्त आहे.

रोनाल्डो आणि जॉर्जिनाची प्रेमकहाणी २०१६पासून सुरू झाली. त्यानंतर दोघेही अनेक वर्षे एकत्र राहिले. ११ ऑगस्ट २०२५ रोजी जॉर्जिनाने सोशल मीडियावर मोठी डायमंड एंगेजमेंट रिंग दाखवत रोनाल्डोसोबत साखरपुडा झाल्याची घोषणा केली होती. त्यानंतर अगदी एक वर्ष पूर्ण होत असतानाच दोघांनी लग्न केले. विशेष म्हणजे त्यांना पाच मुले आहेत.

# भारत-अफगाणिस्तान टी-२० मालिकेचे वेळापत्रक जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात लवकरच एका रोमांचक टी-२० मालिकेचे आयोजन केले जाणार आहे. अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने या तीन सामन्यांच्या मालिकेचे वेळापत्रक जाहीर केले आहे.

जरी ही मालिका अफगाणिस्तान क्रिकेट बोर्ड होस्ट करत असली, तरी सुरक्षेच्या आणि इतर कारणांमुळे मालिकेतील सर्व सामने भारताची राजधानी असलेल्या दिल्लीतच खेळवले जाणार आहेत. तिन्ही सामने दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर १३, १५ आणि १७ सप्टेंबर रोजी खेळवले जातील.

या मालिकेमुळे क्रिकेटप्रेमींना एका नव्या आणि युवा भारतीय संघाची झलक पाहायला मिळणार आहे. संघाचे नेतृत्व श्रेयस अय्यर करणार असून १५ वर्षीय वैभव सूर्यवंशी या मालिकेत पुन्हा एकदा भारतीय संघाच्या जर्सीमध्ये खेळताना दिसणार आहे.

# बार्बाडोसचा जमैकावर रोमहर्षक विजय

## रसेलची झुंझार खेळी अपयशी

**किंगस्टन : वृत्तसंस्था**

कॅरेबियन प्रीमियर लीगमध्ये वेस्ट इंडिजचा तडाखेबाज फलंदाज आंद्रे रसेलने पुन्हा एकदा आपल्या आक्रमक फलंदाजीची झलक दाखवली.

बार्बाडोस ट्रायडेंट्सविरुद्धच्या सामन्यात जमैका किंग्समेनकडून खेळताना रसेलने अवघ्या ३८ चेंडूत ६८ धावा कुटल्या, मात्र संघाला विजय मिळवून देण्यात तो अपयशी ठरला. या रोमहर्षक सामन्यात बार्बाडोस ट्रायडेंट्सने पाच धावांनी विजय मिळवला.



सॅबिना पार्क येथे झालेल्या या सामन्यात बार्बाडोस ट्रायडेंट्सने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ३ बाद २०६ धावा केल्या होत्या. सलामीवीर ब्रँडन किंगने ५१ चेंडूत ७३ धावांची शानदार खेळी केली. त्यानंतर क्विंटन डी कॉकने २५ चेंडूत ४२ धावा केल्या. डावाच्या अखेरीस शेर्फेन रदरफोर्डने आक्रमक फलंदाजी करत अवघ्या २८ चेंडूत नाबाद ५० धावा केल्या. बार्बाडोस ट्रायडेंट्सकडून मिळालेल्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना जमैका किंग्समेनची सुरुवात अत्यंत खराब झाली.

डॅनियल सॅम्सने सुरुवातीच्या षटकांमध्ये जमैकाला धक्के दिले आणि अवघ्या ८ धावांवर संघाचे तीन फलंदाज माघारी परतले. केसी कार्टीने २७ चेंडूत ४५ धावा, तर कर्णधार रॉव्हमन पॉवेलने २४ चेंडूत ३८ धावा करत डाव सावरण्याचा प्रयत्न केला. यानंतर आंद्रे रसेलने मैदानात उतरताच बार्बाडोसच्या गोलंदाजांवर हल्ला चढवला. त्याने अवघ्या ३८ चेंडूत ६८ धावा ठोकल्या. या खेळीत त्याने नऊ षटकार लगावले. रसेलच्या या आक्रमक फलंदाजीमुळे जमैका किंग्समेनच्या विजयाच्या आशा पुन्हा निर्माण झाल्या.

शेवटच्या षटकात जमैकाला विजयासाठी १५ धावांची गरज होती, मात्र मोठा फटका खेळण्याच्या नादात रसेल बाद झाला आणि सामना बार्बाडोस ट्रायडेंट्सच्या बाजुने झुकला. तो बाद झाल्यानंतर जमैकाचा संघ २० षटकांत ९ बाद २०१ धावांपर्यंतच मजल मारू शकला.

बार्बाडोसकडून डॅनियल सॅम्सने प्रभावी गोलंदाजी करत चार षटकांत २० धावा देत चार विकेट घेतल्या आणि संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

# अँड्र्यू फ्लिंटॉफच्या मुलाची ऐतिहासिक खेळी

## लंकाशायरसाठी शतक झळकावणारा सर्वात युवा फलंदाज

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडचा दिग्गज अष्टपैलू खेळाडू अँड्र्यू फ्लिंटॉफचा मुलगा रॉकी याने वयाच्या १८ व्या वर्षी फलंदाजी करताना ऐतिहासिक खेळी केली आहे. रॉकीने इंग्लंडमधील वनडे कप स्पर्धेत लंकाशायर संघाकडून खेळताना सोमररेट संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात ७६ चेंडूंमध्ये १२३ धावांची दमदार शतकी खेळी केली. या खेळीसह तो लंकाशायरच्या वरिष्ठ संघासाठी शतक झळकावणारा सर्वात युवा फलंदाज ठरला आहे.



या सामन्यात फलंदाजी करताना रॉकीने सोमरसेट संघातील गोलंदाजांचा समाचार घेताना १० चौकार आणि सात गगनचुंबी षटकार खेचत शतकी खेळी साकारली. हे शतक त्याने वय १८ वर्ष १२६ दिवस इतके असताना झळकावले आहे. यासह त्याने आर्ची मॅकलारेनचा १३६ वर्षांपूर्वीचा रेकॉर्ड मोडून काढला आहे. मॅकलारेनने १८९०मध्ये फलंदाजी करताना १०६ धावांची शतकी खेळी केली होती. त्यावेळी त्यांचे वय १८ वर्ष २५६ दिवस इतके होते. आता रॉकीने शतक झळकावताना त्याचे वय १८ वर्ष १२६ दिवस आहे.

**सर्वोच्च धावसंख्येसह मोठा विजय**

रॉकीसह किटन जेनिंग्सनेदेखील दमदार फलंदाजी केली. दोघांनी मिळून २१४ धावांची भागीदारी केली. जेनिंग्सने चौकार- षटकारांचा पाऊस पाडत १२७ चेंडूंमध्ये १५६ धावांची खेळी केली. दोघांच्या वादळी खेळीच्या बळावर लंकाशायर संघाने ५० षटकांअखेर सहा गडी बाद ४४३ धावा केल्या. यासह लंकाशायर संघाने लिस्ट ए क्रिकेटमध्ये आतापर्यंतची सर्वोच्च धावसंख्या उभारली. हा सामना लंकाशायर संघाने १७४ धावांच्या मोठ्या फरकाने जिंकून स्पर्धेतील क्वार्टर फायनलमध्ये आपले स्थान निश्चित केले.




# पुण्याच्या मानसची डेव्हिस चषकासाठी निवड

**पुणे : प्रतिनिधी**

हार्ड कोर्टवर खेळण्यासाठी साजेशी शैली असलेल्या पुण्याच्या मानस धामणेला प्रथमच भारताच्या डेव्हिस चषक टेनिस संघात स्थान देण्यात आले आहे. डेव्हिस चषकातील पात्रतेच्या पहिल्या फेरीत भारताने नेदरलँड्सवर ऐतिहासिक विजय मिळवला होता. त्यामुळे संघ व्यवस्थापनाने सप्टेंबरमध्ये सोल येथे दक्षिण कोरियाविरुद्ध होणाऱ्या पात्रता फेरीतील दोन सामन्यांसाठी मुख्य संघात मोठे बदल करणे टाळले आहे.

जागतिक क्रमवारीत ३६२व्या स्थानी असणारा आणि एकेरीतील भारताचा दुसरा मानांकित खेळाडू मानस धामणे बऱ्याच काळापासून वरिष्ठ संघात स्थान मिळविण्याच्या प्रतीक्षेत होता. आता कोरियाविरुद्ध तो अनुभवी सुमित नागल (क्रमवारीत २३५वा) आणि दक्षिणेश्वर सुरेश (क्रमवारीत ३९३वा) यांच्यासह भारताच्या एकेरीची धुरा सांभाळेल. दुहेरीत युकी भांबरी (क्रमवारीत २८वा) आणि एन. श्रीराम बालाजी (क्रमवारीत ५७वा) ही जोडी भारताचे प्रतिनिधित्व करेल. राखीव खेळाडू म्हणून सिद्धार्थ रावत आणि पुण्याच्याच अर्णव पापरकरची निवड करण्यात आली आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com